सांध्य दैनिक

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ३ रे ❑ अंक - १२३ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ शुक्रवार दि. ६ जून २०२५ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

## जगातील सर्वात उंच पुलावर फडकला तिरंगा

### जगातील सर्वात उंच रेल्वे पुलाचं पंतप्रधान मोदींच्या हस्ते उद्घाटन


### कटरा ते संगलदान दरम्यान ६३ किमीच्या रेल्वे मार्गावर रेल्वे सेवा सुरू होणार

विदर्भ प्रजासत्ताक
दि.६ जम्मू

जगातील सर्वात उंच रेल्वे पूल जम्मू-काश्मीरमध्ये तयार करण्यात आला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जगातील सर्वात उंच असलेल्या या चिनाब पुलाचं आज (६ जून) उद्घाटन केलं आहे. हा रेल्वे पूल तयार झाल्यामुळे भारताच्या विकासातील एक महत्वाचा क्षण मानला जात आहे. खरं तर चिनाब नदीवर या पुलाचं बांधकाम करणं हे सर्वात मोठं आव्हान मानलं जात होतं. मात्र, हे आव्हान पूर्ण करत काही महिन्यांपूर्वी या पुलावरून रेल्वेची पहिली यशस्वी चाचणी पार पडली होती. त्यानंतर आज







पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते चिनाब पुलाचं उद्घाटन करण्यात आलं आहे.

हा चिनाब पूल पॅरिसमधील आयफेल टॉवर पेक्षाही उंच आहे. खरं तर जेव्हा बांधकाम सुरू होतं तेव्हा चिनाब पूलाच्या सुरक्षिततेबाबत चिंता व्यक्त करण्यात येत होती. मात्र, आज या चिनाब पुलाचं सर्व बांधकाम यशस्वीरित्या पार पडत आणि सर्व चाचण्या यशस्वीरित्या पार करत हा पूल पूर्ण झाला असून आज या पुलाचं उद्घाटन झालं आहे. आता हा पूल खुला होणार आहे. या पुलाला पूर्ण होण्यासाठी तब्बल दोन दशकांहून अधिकचा कालावधी लागल्याचं सांगितलं जात आहे.

जम्मू-काश्मीरमधील हा चिनाब पूल भारताच्या पायाभूत सुविधांच्या प्रवासात एक ऐतिहासिक टप्पा मानला जात आहे. जम्मू-काश्मीरच्या विकासासाठी हा चिनाब पूल महत्वाचा टप्पा मानला जात आहे. आज या पुलाच्या उद्घाटनापूर्वी पंतप्रधान मोदी यांनी या संपूर्ण पुलाची पाहणी केली आहे. चिनाब पुलाच्या उद्घाटनानंतर आता कटरा ते संगलदान दरम्यान ६३ किमीच्या रेल्वे मार्गावर रेल्वे सेवा सुरू होणार आहे.

दरम्यान, चिनाब पूल हा जम्मू आणि काश्मीरमधील उधमपूर-श्रीनगर-बारामुल्ला रेल्वे लिंकचा एक महत्वाचा भाग मानला जात आहे. या पुलाची वैशिष्ट्ये सांगायची झाल्यास हा चिनाब पूल जगातील सर्वात उंच पूल आहे. तसेच हा पूल आयफेल टॉवर टॉवरपेक्षा पूल उंच असून या पुलाच्या बांधकामासाठी २२ वर्ष लागले आहेत. तसेच या चिनाब पुलासाठी १५ हजार कोटींपेक्षा जास्त खर्च करण्यात आल्याचं सांगितलं जातं.

## महाराष्ट्राच्या मनात आहे तेच होईल, उद्धव ठाकरेंचं मनसेशी युतीबाबत केले विधान

विदर्भ प्रजासत्ताक दि.६मुंबई

गेल्या काही दिवसांपासून राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे हे एकत्र येणार असल्याच्या चर्चा राजकीय वर्तुळात सुरु आहेत. या चर्चांचं कारण म्हणजे राज ठाकरे यांनी एका मुलाखतीत बोलताना एक सूचक वक्तव्य केलं होतं. त्यांच्या वक्तव्यानंतर मनसे आणि ठाकरे गटाच्या युतीच्या चर्चा सुरु झाल्या. त्यानंतर उद्धव ठाकरे यांनी देखील राज ठाकरे यांच्या वक्तव्याला प्रतिसाद दिला होता. त्यानंतर आज ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी माध्यमांशी बोलताना एक सूचक विधान केलं होतं. कदाचित त्या दोघांमध्ये (राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांच्यात) युतीबाबत फोन झालेही असतील असं भाष्य राऊत यांनी केलं होतं.



दरम्यान, त्यानंतर मनसे नेते अविनाश जाधव यांनी देखील सूचक विधान करत तुम्ही एक पाऊल पुढे या, राज ठाकरे १०० पावलं पुढे येतील असं म्हटलं होतं. त्यानंतर आता खुद्द उद्धव ठाकरे यांनी मनसेशी युती करण्याच्या संदर्भात मोठं भाष्य केलं आहे. 'महाराष्ट्राच्या मनात आहे तेच होईल', असं उद्धव ठाकरे यांनी माध्यमांशी बोलताना म्हटलं आहे. त्यांच्या या विधानामुळे राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आलं आहे.

राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे एकत्र कधी येणार? याकडे अवघ्या महाराष्ट्राच लक्ष लागलं आहे. साद दिली, प्रतिसादही सकारात्मक आहे. मनसेकडून सांगितलं जात आहे की युतीचा प्रस्ताव पाठवा, यावर तुमची प्रतिक्रिया काय? असा प्रश्न माध्यमांच्या प्रतिनिधींनी उद्धव ठाकरे यांना विचारला. यावर बोलताना उद्धव ठाकरे यांनी सकारात्मक प्रतिक्रिया दिली. ते म्हणाले की, ठीक आहे, बघुया, जे महाराष्ट्रातील जनतेच्या मनात आहे ते होईल, असं उद्धव ठाकरे यांनी म्हटलं आहे.

## तयारीला लागा! नीट पीजी परीक्षेच्या नव्या तारखेला सुप्रीम कोर्टाची मंजुरी; ३ ऑगस्ट रोजी होणार परीक्षा




विदर्भ प्रजासत्ताक
दि.६नवी दिल्ली

वैद्यकीय प्रवेशासाठी घेण्यात येणारी नीट परीक्षा पुढे ढकलण्यात आली होती. या परीक्षा एकाच टप्प्यात घेण्याचे निर्देश दिल्यानंतर छइए ने परिक्षा पुढे ढकल्याची विनंती केली होती. त्यावर आज सुनावणी पार पडली. त्यात सुप्रीम कोर्टाने या परीक्षा ३ ऑगस्ट रोजी घेण्यास मान्यता दिली आहे. त्यानुसात आता या परीक्षा एकाच टप्प्यात होणार आहेत. यापूर्वी ही परीक्षा १५ जून रोजी दोन शिफ्टमध्ये घेण्यात येणार होती. मात्र, या परीक्षा दोन शिफ्टमध्ये न घेता एकाच शिफ्टमध्ये घ्या असे निर्देश यापूर्वी सर्वोच्च न्यायालयाने दिले होते. त्यानंतर ही परीक्षा पुढे ढकलण्यात आली होती. मात्र, आता या परीक्षा ३ ऑगस्ट रोजी घेण्यास सर्वोच्च न्यायालयाने परवानगी दिली आहे.


परीक्षा दोन शिफ्टमध्ये घेतल्याने प्रश्नांच्या काठिण्य पातळीत फरक होऊ शकतो, ज्यामुळे असमानता आणि मनमानी निर्माण होईल असे निरीक्षणदेखील न्यायालयाने सुनावणीवेळी नोंदवले. कोणत्याही दोन प्रश्नपत्रिकांची काठीण्य पातळी कधीही पूर्णपणे सारखीच म्हणता येणार नाही. त्यामुळे एकसमान मानके सुनिश्चित करण्यासाठी एकाच शिफ्टमध्ये परीक्षा घेणे आवश्यक असल्याचे निरीक्षण सुप्रीम कोर्टाने गेल्या सुनावणीवेळी नोंदवत परीक्षा एकाच टप्प्यात घेण्याचे निर्देश दिले होते.

नीट पीजी परीक्षा एकाच टप्प्यात घेण्याच्या निर्णयामुळे वैद्यकीय विद्यार्थ्यांना दिलासा मिळाला आहे. कारण आता त्यांना इतर कोणत्याही शिफ्टच्या कठीण किंवा सोप्या पेपर्सची चिंता करावी लागणार नाही. सर्व उमेदवार एकाच वेळी समान प्रश्नांसह परीक्षा देतील, ज्यामुळे निकालांची निष्पक्षता आणि पारदर्शकता सुनिश्चित होण्यास मदत होणार आहे. नीट पीजीच्या परीक्षा एकाच शिफ्टमध्ये घेतल्याने पारदर्शकता राहील आणि सर्व उमेदवारांना समान संधी मिळेल, असही कोर्टाने म्हटलं आहे.

## गडचिरोलीत माझ्या एवढा फिरलेला दुसरा मुख्यमंत्री कोणीच नाही; देवेंद्र फडणवीस महाराष्ट्राच्या 'बॉर्डर'वर

विदर्भ प्रजासत्ताक
दि.६गडचिरोली

महाराष्ट्रातील नक्षल प्रभावी जिल्हा म्हणून ओळख असलेल्या गडचिरोली जिल्ह्याचे पालकमंत्रीपद मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्वीकारले आहे. गडचिरोलीत माझ्या एवढा फिरलेला मुख्यमंत्री दुसरा कोणीच नाही, असे म्हणत मुख्यमंत्री फडणवीस यांनी गडचिरोली जिल्ह्यातील नक्षलवादी भागात आपण स्वत: शेवटच्या टोकापर्यंत दौरे केल्याचं एबीपी माझाशी बोलताना म्हटले. तसेच, लवकरच गडचिरोलीमधून माओवाद संपुष्टात आणू असा दावाही





त्यांनी केला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत आज गडचिरोलीत १३ आत्मसमर्पित नक्षलवादी युवक-युवतींचा सामूदायिक विवाहसोहळा संपन्न होत आहे. स्वत: देवेंद्र फडणवीस हे नवजोडप्यांना आशीर्वाद देण्यासाठी लग्नसोहळ्याला उपस्थित राहत आहेत. तत्पूर्वी त्यांनी गडचिरोली जिल्ह्याच्या शेवटच्या टोकावर जाऊन पाहाणी केली.

माझ्या एवढं गडचिरोलीत फिरणारा दुसरा मुख्यमंत्री महाराष्ट्रात कोणीही नाही, या ठिकाणी विपरीत परिस्थितीत आपले सिक्युरिटी फॉर्सेस चांगलं काम करत आहेत. या सुरक्षा यंत्रणांचा मनोबल वाढवे म्हणून मी अशा आऊटपोस्टवर दुर्गम भागात जात असतो. लवकरच गडचिरोलीमधून माओवाद पूर्णपणे संपुष्टात आणू असा विश्वासही त्यांनी यावेळी बोलून दाखवला. आजवर गडचिरोलीचा विकास आणि विकासाची क्षमता नेत्यांच्या भाषणामध्ये असायची. मात्र, २०१४ नंतर आम्ही प्रत्यक्ष आणि गडचिरोलीत बदल घडवून आणले. मात्र, गडचिरोलीत औद्योगिक विकास करत असताना इथले जल, जंगल आणि जमीन वाचवून आपल्याला विकास करायचा आहे. गडचिरोलीचा नैसर्गिक स्वभाव आपण बदलणार नाही, असेही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यावेळी स्पष्ट केले.

## पुन्हा सामाजिक न्याय विभागाचा ४१० कोटींचा निधी वळवला




विदर्भ प्रजासत्ताक
दि.६मुंबई

राज्यात महायुती सरकारसाठी लाडकी बहीण योजना विधानसभा निवडणुकीत गेमचेंजर ठरली. परंतु आता हीच योजना महायुतीसाठी कळीचा मुद्दा ठरत आहे. अजित पवार या योजनेसाठी आदिवासी विभाग आणि सामाजिक न्याय विभागाचा निधी वळवत असल्याचं बोललं जातं आहे. राज्य सरकारची लाडक्या बहिणींसाठी दमछाक होताना दिसत असून योजनेसाठी सामाजिक न्याय विभागाचा निधी पुन्हा एकदा वळवण्यात आल्याची माहिती मिळत आहे.

सामाजिक न्याय विभागातील अनुसूचित जाती घटकांसाठी असलेला ४१०.३० कोटींचा निधी लाडकी बहीण योजनेसाठी वळवण्यात आल्याची माहिती मिळत आहे. यामुळे पुन्हा एकदा महायुतीत वाद होण्याची शक्यता आहे. अगोदर ओबीसी नेत्यांनी अर्थमंत्री अजित पवारांना यावरून घेरलं आहे.

आतापर्यंत सामाजिक न्याय आणि अदिवासी विभाग या दोन विभागांचा १,८२७ कोटी ७० लाख कोटींचा निधी महिला अन् बाल विकास विभागाकडे वळवण्यात आलाय. अर्थ विभागपूर्ण निधी दिल्याची दिशाभूल करतंय, असा आरोप देखील यावेळी केला जात आहे.

सामाजिक न्याय अन् विशेष सहाय्य विभागाचा ४१०.३० कोटी निधी दोन वेळा वळवण्यात आलाय. तर आदिवासी विभागाचा ३३५ कोटी ७० लाख रुपयांचा निधी तीन वेळा वळवण्यात आलाय. सामाजिक न्याय अन् विशेष सहाय्य विभागाचा ८२०.६० कोटी अन् आदिवासी विभागाचा १ हजार ७ कोटीचा वळवण्यात आला आहे. दोन्ही विभागाचे मिळून लाडकी बहीण योजनेंसाठी १८२७ कोटी ७० लाख रूपये वळवण्यात आले आहेत.

## पालकमंत्री बावनकुळेंच्या आदेशानंतर गोवंश तस्करांची टोळी जाळ्यात

विदर्भ प्रजासत्ताक
दि.६नागपूर

बकरी ईदच्या निमित्ताने मोठ्या प्रमाणावर गोवंश तस्करी होत असल्याने तस्करांना जेरबंद करा असे आदेश पालकमंत्री व महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी पोलिसांना दिल्याने जुनी कामठी भागात पोलिसांनी केलेल्या धडाकेबाज कारवाईत २३८ गोवंशीय प्राण्यांची सुटका करण्यात आली. विशेष म्हणजे, सुमारे २४ लाखांच्या मुद्देमालासह तस्करांनी टोळी जेरबंद करण्यात आली.




जिल्ह्यातील पोलिस यंत्रणा या कारवाईनंतर सतर्क झाली असून, गोवंश तस्करांच्या मुसक्या आवळणे सुरू केले आहे. बकरी ईद च्या पार्श्वभूमीवर गोवंश हत्या होऊ नये यासाठी पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी पोलिसांना कडक कारवाई चे आदेश दिले होते. त्यामुळे पोलीस अलर्ट मोडवर होते. काल रात्री माहितीच्या आधारे पोलिसांनी जुनी कामठी परिसरातील एका गोडाऊन मध्ये छापा टाकला. यावेळी २३८ गोवंश त्याठिकाणी मरणासन्न अवस्थेत आढळून आले. पोलिसांनी या सर्व गोवंश ची सुटका केली. या प्राण्यांची एकूण किंमत सुमारे २३,८०,००० रुपये आहे.या प्रकरणी पोलिसांनी गोडाऊन मालक आणि घरमालक नब्बु वजीर कुरेशी, साजिद कुतुब कुरेशी, जुबेर अल्ताब कुरेशी, फैय्याज सत्तार कुरेशी, आसिफ कुरेशी आणि त्यांना मदत करणाऱ्या इतर व्यक्तींवर गोवंशीय प्राण्यांची अवैध कत्तली करण्याचा आरोप खाली आरोपींविरुद्ध गुन्हा नोंदवून ताब्यात घेतले आहे.


## आत्मसमर्पित १३ नक्षलवादी युवक-युवतींचं शुभ मंगल सावधान

### मुख्यमंत्र्यांकडून आशीर्वाद, पोलीस बनले वऱ्हाडी

विदर्भ प्रजासत्ताक
दि.६गडचिरोली

लग्न हा प्रत्येकाच्या आयुष्यातील आनंदाचा आणि सुखाचा क्षण असतो. त्यामुळेच, मित्र-परिवार, नातेवाईक, सहकारी सर्वजणांच्या साक्षीने या आनंदाच्या सोहळ्याचे सेलिब्रेशन होत असते. गरिबापासून श्रीमंतांपर्यंत प्रत्येकाच्या जीवनात हा क्षण सदैव आठवणीत राहणारा असतो. मुलगा थोडा वाईट वागत असेल, किंवा जबाबदारीने वागत नसेल तर घरचे म्हणतात, याचं लग्नलावून द्या म्हणजे सुधारेल. मात्र,





गडचिरोलीतील नक्षलवादी लग्नाआधीच चांगल्या मार्गावर आले असून त्यांनी आत्मसर्पण केलं आहे. या आत्मसमर्पण केलेल्या १३ नक्षल युवक-युवतींचा लग्नसोहळा मोठ्या उत्साहात आणि पोलिसांच्या साक्षीने संपन्न झाला आहे. विशेष म्हणजे गडचिरोली पोलीस मुख्यालयात चक्क मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत येथे शुभ मंगल सावधान म्हणत अक्षता पडल्या आहेत.

गडचिरोली पोलीस दलातर्फे आत्मसमर्पित नक्षलवादी युवक युवतींचा सामूहिक विवाह सोहळा आयोजित केला असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत हा आगळावेगळा लग्नसोहळा संपन्न होत आहे. जवळपास १३ आत्मसमर्पित नक्षल युवक युवती या विवाह सोहळ्यातून लग्न बंधनात अडकणार आहेत. तत्पूर्वी गडचिरोली पोलीस दलाच्या बँड पथकाद्वारे पोलीस मुख्यालय परिसरातून वर-वधुंची वाजत जागत वरात काढण्यात आली. या वरातीत पोलीस कर्मचारी वऱ्हाडी बनवून सहभागी झाले होते.

## मुंबई हल्ल्याचा मास्टरमाईंड हाफीज सईदला पाकिस्तान भारताला सोपवणार?

विदर्भ प्रजासत्ताक
दि.६इस्लामाबाद

कुख्यात दहशतवादी हाफीज सईद सध्या पाकिस्तान सरकारच्या सुरक्षेत असल्याचा दावा हाफीज सईदचा मुलगा तल्हा सईदने केला आहे. हाफीज सईज आरामात जगतायेत, पाकिस्तान सरकार कधीही त्यांना भारताला सोपवण्याचा विचारही करणार नाही असा पूर्ण विश्वास आहे. एका मुलाखतीत तल्हा सईदने हे विधान केले आहे. मागील काही काळापासून तल्हा सईद सातत्याने पाकिस्तानच्या मीडियात आणि सार्वजनिक कार्यक्रमात दिसून येत आहे. हाफीद सईदच्या ढासळत्या प्रकृतीमुळे तल्हाने त्याची जागा घेतल्याचे बोलले जाते.



तल्हा सईदच्या मुलाखतीचा व्हिडिओ समोर आला आहे. त्यात तल्हाला विचारण्यात आलं की, पाकिस्तान सरकार भारताची कित्येक वर्षांची मागणी पूर्ण करत हाफीज सईदला त्यांना सोपवू शकते का? त्यावर तल्हाने उत्तर दिले. पाकिस्तान सरकार कुठल्याही किंमतीत हे पाऊल उचलू शकत नाही. हाफीज सईदवर भारताने लावलेले आरोप बिनबुडाचे आहेत हे पाकिस्तानी एजन्सी आणि सरकारला चांगले माहिती आहे. भारत कायम हाफीज सईदविरोधात अजेंडा चालवत आहे. पाकिस्तानचं सरकार कधीही सईदला भारताला सोपवण्याचा विचार करणार नाही. त्यामुळे हा प्रश्नच येत नाही असं त्याने ठामपणे सांगितले.

## संपादकीय ......

# शिवराज्याभिषेक : सार्वभौम राज्याची स्थापना

*शिवराज्याभिषेक ही इतिहासातील एक महान क्रांतिकारी, ऐतिहासिक आणि प्रेरणादायक घटना आहे. मध्ययुगीन काळात राज्यकारभार करणे, पत्रव्यवहार, तह, करार, न्यायदान, चलन व्यवस्था, कृषी कायदे, करप्रणाली, संरक्षण, दळणवळण आदी कामांसाठी राज्याभिषेक अत्यावश्यक होता. जोपर्यंत राज्याभिषेक नव्हता, तोपर्यंत शिवरायांनाही सरदाराचा पुत्र, जमीनदार, वतनदार, असेच समजले जात असे. शिवराज्याभिषेकाने स्वातंत्र्याचा अरुणोदय झाला. सार्वभौम राज्य स्थापन झाले.*

*भारतात आज आपण संसदीय लोकशाहीत आहोत. आपल्याला संविधानाने अनेक हक्क, अधिकार दिलेले आहेत. त्यामध्ये प्रत्येक भारतीय नागरिकाला मतदानाचा अधिकार आहे. तसेच, विहित अटी पूर्ण करणाऱ्यांना निवडणुकीला उभे राहण्याचा अधिकार आहे. त्यामुळे आपल्या देशाच्या राष्ट्रपती, पंतप्रधान आणि मंत्रिपदी कोणत्याही जाती-धर्माचा व्यक्ती लोकशाही मार्गाने निवडला जातो. विद्यमान नेतृत्व हे वंशपरंपरेने नव्हे, तर कर्तृत्वाने आणि लोकनियुक्त आहे; पण मध्ययुगीन काळात अशी परिस्थिती नव्हती. भूमिपुत्रांनी राज्याभिषेक करणे, राजा होणे, नेतृत्व करणे ही संकल्पना खूप कठीण होती. येथील कष्टकरी, श्रमकरी, शेतकरी, अस्पृश्य जातींना केवळ कष्ट करायचे, लढायचे; पण प्रतिनिधित्वाचे स्वप्न पाहावयाचे नाही, हा तो काळ होता. अशा काळात छत्रपती शिवाजी महाराज राज्याभिषेक करतात, ही एक महान क्रांतिकारी, ऐतिहासिक आणि प्रेरणादायक घटना आहे.*

*राज्याभिषेक ही दबलेल्या, नाउमेद झालेल्या, पिचलेल्या, हताश झालेल्या एतद्देशीयांना नवचैतन्य देणारी घटना आहे. आपण लढू शकतो, आपण जिंकू शकतो आणि आपण उत्तम प्रकारे राज्यकारभार करू शकतो, ही प्रेरणा नाउमेद झालेल्या भारतीयांच्या मनात शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकाने निर्माण केली. सभोवताली मोगल, आदिलशहा, पोर्तुगीज, इंग्रज, कुतुबशहा राज्य करत होते; पण तो अधिकार एतद्देशीयांना नव्हता. तो महत्प्रयासाने मिळविण्याचे क्रांतिकारक कार्य छत्रपती शिवाजीराजांनी केले. त्यामुळे त्यांचा समकालीन असणारा कृष्णाजी अनंत सभासद सांगतो, हा मराठा पातशहा एवढा छत्रपती झाला ही गोष्ट काही सामान्य झाली नाही. अर्थात, शिवराज्याभिषेक ही घटना असामान्य आहे, असे सभासद म्हणतो.*

*छत्रपती शिवाजीराजांनी राज्याभिषेकाचा निर्णय घेतला. त्यांच्या राज्याभिषेकाला अनेक अडचणी आल्या. त्यावर त्यांनी मात केली. त्यांच्या कणखर आणि दूरदृष्टीच्या मातोश्री जिजाऊ माँसाहेब त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभ्या राहिल्या. जिजाऊंनी त्यांच्या खासगी खर्चाची २५ लाख पगोडा रक्कम राज्याभिषेकप्रसंगी स्वराज्यासाठी शिवाजी महाराजांकडे सुपूर्द केली. स्वराज्य स्थापनेसाठी अनेक अडचणी आल्या; पण शिवाजीराजे संकटसमयी लढणारे होते. रात्रंदिन काबाडकष्ट करणाऱ्या मावळ्यांनी स्वराज्यासाठी घाम गाळला, रक्त सांडले. राज्याभिषेकाच्या प्रसंगाचे वर्णन प्रत्यक्षदर्शी कृष्णाजी अनंत सभासद यांनी रसाळ, लालित्यपूर्ण भाषेत केलेले आहे. ते म्हणतात की, वाराणसीचे पंडित गागाभट्ट हे शिवराज्याभिषेकासाठी आले. शिवाजीराजांनी चार पातशहा जिंकल्या. अनेक किल्ले जिंकले. पाऊण लाख घोडा लष्कर निर्मिले, त्यामुळे त्यांना राज्याभिषेक व्हावा, त्यासाठी पूर्ण नियोजन केले. अनेक मातब्बर लोक बोलावले. बत्तीस मण सोन्याचे सिंहासन निर्मिले. ६ जून १६७४ रोजी राज्याभिषेक रायगडावर यथाविधी पार पडला.*

*राज्याभिषेकाचे वस्तुनिष्ठ वर्णन करणारा दुसरा महत्त्वाचा प्रत्यक्षदर्शी म्हणजे इंग्रजांचा वकील हेन्री ऑक्सेंडेन होय. हा राज्याभिषेकाला रायगडावर हजर होता. तो लिहितो, ६ जूनला सकाळी सात किंवा आठच्या सुमारास मी दरबारात गेलो. शिवाजीराजे एका भव्य सिंहासनावर बसले होते. सरदार, अधिकारी, प्रतिनिधी त्यांच्या समोर बसले होते. पुत्र संभाजीराजे व इतर मंत्री मानानुसार स्थानापन्न झाले होते. शिवाजीराजांनी हेन्रीला व नारावण शेणवीला जवळ बोलावले. शिवाजीराजांना मुजरा करून हिऱ्याची अंगठी भेट दिली त्या प्रसंगाचे व त्या ठिकाणी केलेल्या सजावटीचे इथंभूत वर्णन हेन्री ऑक्सेंडेनने केलेले आहे. राज्याभिषेकावेळी रायगडावर हत्ती, घोडे कसे आणले असतील? याचे आश्चर्य हेन्री व्यक्त करतो. अर्ध्या जगावर राज्य करणाऱ्या ब्रिटिशांनाही आश्चर्य वाटावे आणि त्यांनी रायगडावर येऊन शिवरायांना मुजरा करावा, हे शिवराज्याभिषेकाचे महत्त्व आहे. राज्याभिषेकाने शिवाजी महाराज अधिकृत राजा झाले. ते छत्रपती झाले. राज्यकारभार करण्याचा त्यांना अधिकार मिळाला. राज्याभिषेकाने त्यांना जागतिकस्तरावर मान्यता मिळाली. रयतेला राजा मिळाला. शेकडो वर्षांची गुलामगिरी नष्ट झाली. हा राजकीय स्वातंत्र्याचा उद्घोष होता. नाउमेद झालेल्या प्रजेला राज्यकर्ता होण्याचा आत्मविश्वास राज्याभिषेकाने मिळाला. राज्याभिषेकानंतर शिवाजीराजांनी स्वतःचा शिवशक सुरू केला. राज्याभिषेकाने शिवाजी महाराज शककर्ते झाले. त्यांनी स्वतःची चलन व्यवस्था सुरू केली. सोन्याचे होन व तांब्याची शिवराई ही त्यांची चलन व्यवस्था होती. आधुनिक लोकशाहीचा पाया या शिवराज्याभिषेकात आहे. आपले राज्य, आपला राजा, आपले चलन, आपली संहिता, आपले निर्णय, आपली संस्कृती हे केवळ राज्याभिषेकानेच शक्य झाले.शिवराज्याभिषेकाचा रयतेला आनंद झाला. मातोश्री जिजाऊ कृतार्थ झाल्या. शहाजीराजे-जिजाऊंनी पाहिलेले स्वराज्याचे स्वप्न साकार झाले. मावळ्यांच्या त्यागातून हा सुवर्णक्षण पाहता आला. या राज्याभिषेकाला एकूण एक करोड बेचाळीस लाख होन इतका खर्च झाला, असे सभासद सांगतात. हा पहिला राज्याभिषेक होय. त्यानंतर २४ सप्टेंबर १६७४ रोजी शिवरायांनी तांत्रिक पद्धतीने राज्याभिषेक केला. यामध्ये संस्कृत विद्वान असणाऱ्या छत्रपती संभाजी महाराजांची भूमिका महत्त्वपूर्ण होती. या राज्याभिषेकाचे पौरोहित्य निश्चलपुरी यांनी केले. हा दुसरा राज्याभिषेक होता. शिवाजी महाराजांनी राज्याभिषेकासाठी रायगड निवडला; कारण हा किल्ला सुरक्षिततेसाठी महत्त्वपूर्ण आहे. शिवाजी महाराजांनी धार्मिक, राजकीय, भौगोलिक परिस्थितीचा यथायोग्य अभ्यास करून राज्याभिषेक सोहळा पार पाडला.*

# क्रिकेट सट्टेबाजांच्या २२ मोबाईल व ३ लॅपटॉपची तपासणी

## मुख्य सटोडियापर्यंत पोहोचण्याचा पोलिसांचा प्रयत्न

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.६अमरावती**



बुधवारी रात्री आयपीएल क्रिकेटची फायनल मॅच सुरु असताना गुन्हेशाखेच्या पथकाने शहरात धाडी टाकून पाच सट्टेबाजांना अटक केली. गुरुवारी सकाळपासून त्यांची कसून चौकशी केली जात आहे. त्यांच्याकडून जप्त केलेले २२ मोबाईल व ३ लॅपटॉपमधील डाटा तपासला जात आहे. त्यातून अमरावतीसह मुंबई, नागपूर, आणि यवतमाळ येथील बुकींची नावे समोर येण्याची शक्यता वर्तविली जात आहे.

छांगाणीनगर येथे सुरु असलेल्या आयपीएल क्रिकेट सट्टयावर गुन्हेशाखेच्या पथकाने बुधवारी रात्री धाड टाकूण ५ सट्टेबाजांना अटक केली. तसेच त्यांच्या ताब्यातून २२ मोबाईल, ३ लॅपटॉप, व्हाईस रेकॉर्डर, एलईडी टिव्ही आणि रोख असा एकूण ३ लाख ७९ हजार २०० रुपयांचा मुद्देमाल जप्त तसेच योगेश प्रमोद साबू, तुषार दिलीप करवा, हर्षल हनुमानदास राठी, दिपक शंकर गोस्वामी आणि आकाश किसनराव इंगोले यांना अटक केली.न्यायालयाने त्यांना तीन दिवसाची पो लीस कोठडी सुनावली आहे. पाचही आरोपींची वेगवेगळी चौकशी केली जात आहे. क्रिकेट सट्टा कसा घेतला जातो,ग्राहकांसोबत पैशाचा व्यवहार कसा होतो शहरात किंवा शहराबाहेर कोणाला उत्तरी दिली जाते, यासर्व बाबींची चौकशी जात आहे.

### आठ-नऊ वर्षांपासून सुरू होता क्रिकेट सट्टा

अटकेतील योगेश साबू, तुषार करवा आणि हर्षल राठी हे शहरात ८ ते ९ वर्षापासून क्रिकेटचा सट्टा चालवीत आहे. यापूर्वी ते शहराबाहेर उतारी देत होते. परंतु दोन वर्षापूर्वी शहर पोलिसांनी क्रिकेट सट्ट्यांवर धाडी टाकल्यानंतर ते शहरातील एका व्यक्तीकडे उतारी देत होते. शहरातील त्या बुकींविरुद्ध पुरावा मिळविण्याचा प्रयत्न पोलीस करीत आहेत.

### ७० ते ८० जणांची नावे समोर येण्याची शक्यता

जप्त केलेल्या तीन लॅपटॉपमधील डाटा आणि २२ मोबाईलमील नंबरची पोलिसांनी योग्यरित्या तपासणी केली तर ७० ते ८० बुकी व सट्टेबाजांचे व त्यांचे पत्ते इत्यादी माहिती समोर येण्याची शक्यता आहे. परिणामी शहरातील बुकींनी त्यांचे मोबाईल बंद करून ते राजकीय पुढाऱ्यांना शरण गेल्याची चर्चा होत आहे.




## वयाच्या तिशीनंतर महिलांसाठी गरजेचे 'हे' ३ व्हिटामिन्स, थकवा-कमजोरी जवळही फिरकणार नाही...

**दि.६विदर्भ प्रजासत्ताक**

जसजसं वय वाढत जातं महिलांच्या शरीरात हार्मोन्स वेगानं बदलतात. ३० वयानंतर जेव्हा पहिलं बाळ होतं त्यानं महिलांना वेगवेगळ्या शारीरिक समस्यांचा सामना करावा लागतो. वेदना, थकवा आणि कमजोरी सतत जाणवत राहतात. कमी वयातच जास्त वयाची लक्षणं दिसू लागतात आणि शरीरात इतरही आजार घर करतात. अशात प्रत्येक महिलेला शरीर फिट ठेवण्यासाठी ३० वयानंतर ३ व्हिटामिन्सची अधिक गरज असते.




कारण वाढत्या वयासोबत त्वचेवर आणि शरीरावर एजिंग दिसू लागते. वय वाढलं की, शरीराचा शेप आधीसारखा राहत नाही हे तुम्हीही अनुभवलं असेल. जसे की, पोट बाहेर निघतं, त्वचेवर हलक्या सुरकुत्याही दिसू लागतात. दिवसभर घरातील आणि ऑफिसचं काम करून जास्त थकवा जाणवतो. जास्तीत जास्त महिलांसोबत हेच होतं. पण अनेक महिलांना हे माहीत नसतं की, काही व्हिटामिन्स घेतल्यास या समस्या दूर होऊ शकतात. हे व्हिटामिन्स कोणते तेच जाणून घेऊया.

**महिलांसाठी आवश्यक ३ व्हिटामिन्स**

**मॅग्नेशिअम-** मॅग्नेशिअम इक्ह नियमितपणे घेतल्यास भूक कंट्रोल होते. तसेच काही गोड खाण्याची क्रेविंगही कमी होते. पोटात होणारा गॅस आणि पोट फुगण्याची समस्या देखील कमी होते. सगळ्यात चांगली बाब म्हणजे मॅग्नेशिअमनं शरीरातील वॉटल रिटेंशन कमी होतं. ज्यामुळे तुम्हाला हलकं वाटतं आणि तुम्ही फिट राहता.

**कॅल्शिअम-**कॅल्शिअममुळे शरीरात भरपूर कोलेजनचं उत्पादन होतं. ज्यामुळे केस मुलायम आणि हायड्रेट राहतात. नखं मजबूत होतात. त्वचेवरील सुरकुत्या दूर होतात. इतकंच नाही तर चेहऱ्यावरील लाइन्सही दूर होतात.

**सोडिअम**

महिलांसाठी तिसरं सगळ्यात महत्वाचं व्हिटामिन्स आहे सोडिअम. सोडिअममुळे पाठ आणि कंबरेचं दुखणं दूर केलं जाऊ शकतं. सोडिअमनं जॉइंट्समध्ये लवचिकता येते आणि हाडांमधील वेदना दूर होतात. तसेच कंबरेचं दुखणंही दूर होतं. ज्यांना व्हेरिकोज व्हेन्स आणि स्ट्रेच मार्क्सची समस्या आहे त्यांच्यासाठी हे व्हिटामिन खूप महत्वाचं आहे. यानं ब्लड सर्कुलेशन चांगलं होतं.

# खोल नांगरट का आणि कशाने करावी? तिचे फायदे काय? समजून घेऊया.

**दि.६विदर्भ प्रजासत्ताक**

बदलते वातावरण तसेच वेगवेगळ्या पीकपद्धती, अति रासायनिक खताचा वापर, अतिवृष्टी, ओला दुष्काळ, कोरडा दुष्काळ, वेगवेगळ्या सिंचन पद्धती, पारंपारिक शेतीपद्धती व यांत्रिकारणाचे परिणाम या सर्वांचा मातीवर परिणाम होत आहे. जमिनीमध्ये टणक, कठीण थर निर्माण होत आहे. यावर खोल नांगरट हा उत्तम पर्याय आहे.

**खोल नांगरट म्हणजे काय ?**

जमिनीच्या पृष्ठभागाखालील निर्माण झालेला घट्ट थर फोडला जातो. जमीन सैल केली जाते व जमीन भूसभूशीत होते. साधारण जमिनीच्या प्रकारानुसार हि खोल नांगरट २ ते २.५ फूटापर्यंत केली जाते.

**खोल नांगरटीचे फायदे**

खोल नांगरेटीमुळे जमिनीतील तयार झालेला कडक थर फोडला जातो

खोल नांगरटीच्या माध्यमातून म्हणजेच डींलीळश्रळपस मुळे जमिनी व पाण्याचे संवर्धन होते.

पिकांना सहजपणे आणि सुलभतेने अन्नद्रव्ये जमिनीतून घेता येतात.

पाण्याचे शोषण जमिनीत जास्त प्रमाणात होते.

पाणी साठवून ठेवण्याची क्षमता वाढते.

पिकांची वाढ चांगली होते व उत्पन्नात वाढ होते.

पावसामुळे पिकाचे नुकसान होत नाही. पिक पाण्यात न राहता पिकांचे सडणे टाळले जाते.

पाणी जमिनीवर साचून न राहता व्यवस्थित मुरले जाते.

खोल नांगरट दोन ते तीन वर्षातून एकदा केली तरी चालते त्यामुळे जमिनीचे संवर्धन तर होतेच सोबतच पैशांची व वेळेची ही बचत होते.

**खोल नांगरट कशाने करावी ?**

खोल नांगरटीसाठी एक ट्रॅक्टर चलीत मशीन उपलब्ध आहे. त्या मशीनचे नाव सबसॉईलर हे आहे. ही मशीन जमिनीमधील कडक थर फोडण्याचे व जमिन भुसभुशीत करण्याचे काम करते.

खोल नांगरटीची उत्तम वेळ

खोल नांगरट ही दोन ते तीन वर्षातून एकदा करावी व नोव्हेंबर ते मे महिन्यामध्ये खोल नांगरट केल्यास चांगले परिणाम मिळतात.




शेतकरी ते थेट ग्राहक
कामधेनु नॅचरल्स
उत्तम आहार सर्वोत्तम जीवन
विषमुक्त फळे, भाजी व धान्य एकाच ठिकाणी
समर्थ हायस्कूल जवळ, अकोला अर्बन बँकेच्या बाजुने देवरणकर नगर, अमरावती
नंदकिशोर गांधी, मो. ७७२००७७५५०

# पावसामुळे झाले नुकसान, शेतकऱ्याने तिळाच्या गंजीला लावली आग

## संतापून उचलले टोकाचे पाऊल

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.६तिवसा-** तिवसा महसूल हद्दीत झालेल्या वादळी पावसामुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाल्याने शेतकरी हतबल झाला आहे. वरखेडे मंडळातील मौजा आखतवाडा येथील शेतकरी मिलिद खाकसे यांनी आज सकाळी स्वताच्या शेतातील तीळ पिकांच्या गंजीला आग लावली. सततच्या पावसामुळे तीळाचे नुकसान झाल्याने त्यांनी टोकाचे पाऊल उचलल्याचे त्यांनी सांगितले.

गेल्या आठ दिवसापासून झालेल्या वादळी पावसामुळे ज्वारी, कांदा, तीळ, भुईमूग, फळबाग पिकाचे नुकसान झाल्याचा अंदाज असून सुमारे१४१ हेक्टर जमिन बाधित झाली आहे. एकूणच तिवसा, वरखेड, कुर्ता, वऱ्हा, मोझरी या सर्व मंडळात नुकसानीची नोंद आहे. निसर्गाच्या प्रकोपाने शेतकऱ्यांच्या तोंडी आलेला घास हिसकावून घेतल्याने आर्थिक संकटात सापडला आहे. त्यामुळे पंचनामे होणार कधी, मदत मिळणार तरी केव्हायाविवंचनेतून आखतवाडा येथील शेतकरी मिलिदखाकसे यांनी आपल्या चार एकरातील तीळ पिकाच्या गंजीला आग लावली.

दुसरीकडे आमदार राजेश वानखडे यांच्याकडून नुकसानग्रस्त शेतीची पाहणी करण्यात आली असून तातडीने पंचनामे करण्याचे आदेश सुद्धा कृषीव महसूल विभागाला देण्यात आले आहे.

# 'हरित महाराष्ट्र, समृध्द महाराष्ट्र' अभियानाची प्रभावी अंमलबजावणी करा-विभागीय श्वेता सिंह

## 'एक पेड माँ के नाम' उपक्रमात सक्रीय भाग, डपर्यावरण दिन विभागीय निसर्गाचे वृक्षारोपण

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.६अमरावती-**

पर्यावरण दिनाभिमुख कार्यालयाचे विभागीय श्वेता सिंघल आज वृक्षारोपण करण्यात आले.

पर्यावरणाच्या संरक्षणासाठी प्रत्येकाने आपली सामाजिक संस्था म्हणून आपल्या घराच्या आवारात आईच्या नावाने एक झाड लावावे. राज्याच्या महाराष्ट्र, समृध्द महाराष्ट्र' अभियानाची 'हररावती प्रभावीपणे राज्य सरकार, असे आवाहन श्रीमती सिंह यांनी केले.

अपर कांग्रेस रामदास सिध्दभट्टी, उपयुक्त संतोष कवडे, राजीवके उघडे विभागीय क्षेत्रीय अधिकारी- अधिकारी उपस्थित होते.

संपूर्ण विश्व दिनाचे महत्व विशद करून श्रीमती सिंह म्हणाल्या, प्रत्येक राज्य अधिकारी, कर्मचाऱ्याने वृक्षरोपण कार्यक्रम. राज्य संपूर्ण हर महाराष्ट्र, समृध्द महाराष्ट्र अभियानांतर्गत संपूर्ण विभागी उद्दिष्ट १० कोटी वृक्षांसाठी समूह ठेवले असून आपलाही उल्लेख आजपासून ते १५ ऑगस्ट रोजी उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी वृक्षारोपणाचा कार्यक्रम प्रभावीपणे राब यावा. मला वेळो माझ्या आठवणीत सद्यस्थिती जाणून घेणे फायदेशीर आहे. वृक्षारोपणाचे महत्त्व जाणून प्रत्येकाने स्वयंस्फूर्तीने विचार घ्या. मुबलक प्राणवायू सदस्यांसाठी तसेच ग्लोबल वार्मिंगपासून लोकशाहीला सुरक्षित करावयाचे प्रत्येक वृक्षालेपणाची चळवळ बलकट, असे आवाहन विभागीय अधिकारी श्रीमंत सिंघल यांनी केले.

सार्वजनिक उपस्थित विभागीय न्यायालयातील सर्व अधिकारी अधिकारी पृथ्वीच्या आणि सृष्टी पार्कद्वारे संरक्षण पेरो वृक्षारोपण करून एक माँ नावाचा उपक्रम प्रामाणिकपणे शपथ घेणार आहे.



क्यु आर कोड स्कॅन करा ग्रुप ला जॉइन व्हा

# विदर्भ प्रजासत्ताक

शुक्रवार दि. ६ जून २०२५ शहर/ग्रामिण


# युवा स्वाभिमानाचे इच्छुक भाजपकडून लढणार

## आमदार रवी राणा यांचे पक्ष कार्यकर्त्यांना संकेत

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.६अमरावती,** – आगामी महापालिका निवडणुकीत युवा स्वाभिमानीचे इच्छुक उमेदवारांना . भाजपच्या तिकिटावर निवडणूक लढवाबी लागण्याची शक्यता आहे. आमदार रवी राणा यांनी स्वतः त्यांच्या पक्षाच्या नेत्यांना असे संकेत दिले आहेत. त्यानुसार, युवा स्वाभिमानीचे, काहीनिवडकइच्छुक कामालासुद्धा लागले आहेत.

उल्लेखनीय म्हणजे अलिकडेच युवास्वाभिमानी पक्षाच्या पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांचा एक मेळावा आयोजित करण्यात आला होता. या मेळाव्यात महानगर पालिका निवडणूक लढवण्यास इच्छुकांनीं तिकिटांची मागणी केली होती. यावेळी आमदार रवी राणा म्हणाले की, युवा स्वाभिमानी पक्ष भाजपसोबत



युती करून आगामी महानगरपालिका निवडणूक लढवेल. अशा स्थितीत, जर भाजपला जास्त जागा मिळाल्या, तर स्वाभिमानासाठी इच्छुक असलेल्या काही इच्छुकांना भाजपच्या तिकिटावर निवडणूक लढवावी लागण्याची शक्यता आहे. आमदार रवी राणा यांच्याकडून मिळालेल्या संकेतांच्या इच्छुकांनीही आधारे अशा राणा पद्धतीने महापालिका निवडणुकीची तयारी सुरू केली आहे.आमदार रवी राणा म्हणाले की, विधानसभा




निवडणुकीत शिवसेना शिदे यांच्या उमेदवारांनी भाजपच्या तिकिटावर निवडणूक लढवली होती. त्याचप्रमाणे महानगर पालिकेतही गरज पडल्यास स्वाभिमानीच्या इच्छुकांना भाजपच्या तिकिटावर महानगरपालिका निवडणुकीत उभे केले जाईल. यासाठी आमदार रवी राणा यांनीही इच्छुकांना तयार राहण्यास सांगितले आहे. मात्र रवि राणांची ही रंणनिती भाजपचे स्थानिक नेतृत्व स्वीकारते की नाही हे पाहणे महत्वाचे ठरणार अहे. कारण भाजपने अद्याप आपले पत्ते उघड केलेले नाहीत. परंतु भाजप शहराध्यक्ष आणि ग्रामीण अध्यक्षपदांच्या निवडीमध्ये माजी खासदार नवनीत यांनी ज्या पद्धतीने पुढाकार होता, ते पाहता पुढची रणनिती फारशी कठीण राहणार नाही.उल्लेखनीय असे की, आमदार रवी राणा यांनी युवा स्वाभिमान पक्ष भाजपचा धाकटा भाऊ म्हणून आगामीमहानगरपालिका निवडणूक लढवणार असल्याची घोषणा केली होती. या महायुतीमध्ये भाजपची भूमिका मोठ्या भावासारखी असेल. त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) सोबत युती करण्यासही नकार दिला आहे.

# मेळघाटच्या सीमापार आंतरराज्यीय तस्कर जाळ्यात

### खकनार जवळ जळगावच्या दोघांना पिस्तुलीसह अटक

## दोन्ही आरोपींकडून तीन पिस्तुली जप्त

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.६धारणी,** धारणी तालुक्याच्या अगदी सीमेवर असलेल्या पाचोरी गावातून जळगाव येथील दोन जणांना ३ पिस्तुलीसह अटक करण्यात आल्याने एकच खळबळ उडाली आहे.

बुरहानपूरचे पोलिस अधीक्षक देवेंद्र पाटीदार आणि अतिरीक्त पोलिस अधीक्षक अंतरसिह कनेश तथा एसडीपीओ निर्भयसिंग अलावा यांच्या मार्गदर्शनात खकनार जवळ पांगरी रोडवर माता मंदिराजवळ दोघांना ३ जपानी बनावटीच्या हुबेहुब पिस्तुलीसह अटक करण्यात आली. राहुल प्रकाश जाधव (२७) रा. मुक्ताई नगर आणि सिद्धार्थ संतोष भालेराव (२४) रा. मुक्ताई नगर जि. जळगाव अशी आरोपींची नावे आहेत. त्यांच्याकडून तीन पाचोरी मेड पिस्तुली जप्त करण्यात आल्या. खकनार पोलिस ठाण्याचे ठाणेदार अभिषेक जाधव यांनी आर्म अ‍ॅक्ट तथा एनडीपीएस अ‍ॅक्ट अंतर्गत गुन्हा दाखल केला आहे.एका माहितीनुसार, खकनार पासून जवळच असलेल्या मुक्ताई नगर (जि. जळगाव) येथील राहुल व सिद्धार्थ यांच्याविरुद्ध कर्नाटकच्या चिकमंगलूर आणि जळगाव जिल्ह्यातील वरणगाव पोलिस स्टेशनमध्ये आर्म अ‍ॅक्ट नुसार गुन्हे दाखल आहे. पाचारी येथून पिस्तुली खरेदी करून इतरत्र विकण्याचा व्यवसाय दोन्ही युवक करीत होते. दोन्ही आंतरराज्यीय हत्यार तस्कर असल्याने त्यांना अटक झाल्यानंतर खकनार पोलिसांचे सर्वत्र अभिनंदन करण्यात येत आहे.जप्त केलेल्या मुद्देमालाची किंमत अंदाजे४५ हजाराचे आसपास आहे. या धाडसी कारवाईत निरीक्षक अभिषेक जाधव, सहा. निरीक्षक तारक अली शादाब अली, राजकुमार, मनिष, जितेंद्र चौहान, गोलू खान, सुनिल धुर्वे, विजेंद्र देवल्य, मंगल पालवी, अनिल डावर तसेच शुभम पटेल आदी सहभागी झाले होते. घटनास्थळ धारणीच्या बारातांडा गावापासून जवळच आहे.

# खाजगी शिकवणीवर्गाकडून पालकांची लूट!मनमानी आकारले जाते शुल्क

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.६प्रल्हादपूर**चांदूरबाजार शहरापाठोपाठ ग्रामीण भागातसुद्धा मोठ्याप्रमाणात खाजगी शिकवणी वर्ग घेतल्या जात आहे. त्यामुळे शहरासह ग्रामीण भागातसुद्धा खाजगी शिकवणीच फॅड येऊ निघाले आहे. खाजगी शिकवणी वर्ग संचालकांकडून मोठ्याप्रमाणात फी आकारल्या जात असल्याने चांदूरबाजार शहरासह ग्रामीण भागात पालकाची लूट होताना दिसत आहे.शिकवणी वर्ग सुरू करण्यासाठी शासनाची कसलीही परवानगी घ्यावी लागत नसल्याने जागोजागी शिकवणी वर्ग सुरूझाले आहेत शहरात मात्र गल्लोगल्ली खाजगी शिकवणी दिसून येत आहे. शिकवणी वर्गासाठी शासनाची कोणती नियमावली नसल्याने मोठ्या प्रमाणात शुल्क वसूल केल्या जात आहे. शहरासह ग्रामीण भागात शेतकरी, मजूर, व्यापाऱ्यांची मुले असून आपल्या मुलाला चांगले गुण मिळावेत म्हणून ते पैशांची तजवीज करून शुल्क भरत असतात.अव्वाच्या सव्वा शुल्कामुळे पालकांची लूट होत असून शिक्षण विभागाने पालकांची लूट करणाऱ्या शिकवणी वर्गावर कारवाई करण्याची गरजेचे आहे विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचे काय?शिकवणी वर्गासाठी येणाऱ्या विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने कोणत्याही उपाययोजना खाजगी वर्ग चालवणाऱ्या संचालकांकडून करण्यात येत नाही.

# जागातिक पर्यावरण दिनानिमित्त संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठात वृक्षारोपण



## कुलगुरूंच्या हस्ते शुभारंभ

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५ अमरावती–**
जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठात आज (गुरूवार ५ जून २०२५) वृक्षारोपण कार्यक्रम पार पडला. विद्यापीठाच्या परीक्षा विभागासमोर कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी प्र–कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, परीक्षा व मूल्यमापन मंडळ संचालक डॉ. नितीन कोळी, आजीवन अध्ययन व विस्तार विभाग संचालक डॉ. श्रीकांत पाटील, विद्यार्थी विकास संचालक डॉ. राजीव बोरकर, कार्यकारी अभियंता श्री. शशिकांत रोडे, जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर, अधिसभा सदस्य डॉ. जयंत वडतकर, कर्मचारी संघाचे अध्यक्ष श्री. अजय देशमुख, उपअभियंता (विद्युत) श्री राजेश एडले, उद्यान अधीक्षक श्री अनिल घोम यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

यावर्षी विद्यापीठात एक हजार वृक्षारोपण करणार – कुलगुरू

यावेळी कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी सांगितले की, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ यावर्षी पावसाळी हंगामात विद्यापीठ परिसरात एक हजारपेक्षा जास्त नवीन वृक्षांचे रोपण करणार आहे. विद्यापीठाचा निसर्गरम्य परिसर ४५० एकरमध्ये पसरलेला असून, सध्या येथे साडेचार लाखांहून अधिक वृक्ष डौलदारपणे उभे आहेत. ज्यामुळे पर्यावरण संवर्धनात विद्यापीठाचे मोठे योगदान मिळत आहे. पर्यावरण संवर्धनासाठी विद्यापीठाला यापूर्वी राज्य व राष्ट्रीय स्तरावरील पाच नामांकित पुरस्कार प्राप्त झाले आहेत, असेही कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी यावेळी नमूद केले. विद्यापीठ व संलग्नित महाविद्यालयांतील सर्व विद्यार्थ्यांनी मोठए प्रमाणावर आपापल्या परिसरात वृक्षारोपण करावे व पर्यावरण संवर्धनाच्या कार्यात मोलाचे योगदान द्यावे, असे आवाहनही कुलगुरूंनी याप्रसंगी विद्यार्थ्यांना केले.

वृक्षारोपण करण्याकरीता खड्डे खोदणे व वृक्षारोपणासंदर्भात सर्व कामे करण्याकरीता उद्यान विभागातील कर्मचारी व मजूरांनी अथक परिश्रम घेतलेत. यावेळी विद्यापीठातील शैक्षणिक व प्रशासकीय विभागप्रमुख, अधिकारी, शिक्षक व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### विद्यापीठ परिसर म्हणजे शहराचा 'ऑक्सिजन पार्क'

विद्यापीठाच्या ४५० एकर परिसराचे 'अमरावती शहराचा ऑक्सिजन पार्क' असेही वर्णन यावेळी करण्यात आले. या परिसरात साडेचार लाखांहून अधिक विविध जाती–प्रजातींची झाडे आहेत. याव्यतिरिक्त दोन मोठे जलाशय आणि अनेक बंधारे असल्यामुळे जमिनीत मोठ्या प्रमाणात पाणी मुरते, ज्यामुळे भूगर्भातील पाण्याची पातळी प्रचंड वाढली आहे. विविध पशुपक्षी आणि वृक्षांनी नटलेला हा परिसर निसर्ग सौंदर्यात भर घालत असून, विद्यापीठाचा परिसर पर्यावरण संवर्धनाचा एक मानबिंदू ठरला आहे.

# सार्वजनिक बांधकाम विभाग व कंत्राटदाराच्या मनमानी कारभारामुळे दापोरी येथील नागरिक त्रस्त

## कोट्यावधी रुपये खर्च करून बांधलेल्या सालबर्डी–मोर्शी मार्गाचे काम निकृष्ट दर्जाचे

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.६मोर्शी** ४मोर्शी तालुक्यातील दापोरी सालबर्डी रस्ता तीर्थक्षेत्र संत्राप्रकीया उद्योगास जोडणाऱ्या महत्वाच्या रस्त्याची सुधारणा करण्या करिता हायब्रीड एन्यूटी प्रकल्पा अंतर्गत या रस्त्याचे काम कोट्यावधी रुपये खर्च करून करण्यात आले मात्र वेल्सपन इम्फ्रा प्रा. लि. कंपनी व संबंधित बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांच्या निष्काळजीपणामुळे या मार्गाचे काम ८ वर्षाचा कालावधी लोटून सुद्धा दापोरी गावातील अपूर्ण कामे अनेक वेळा पत्र व्यवहार करून सुद्धा पूर्ण करण्यास वेल्सपन इम्फ्रा प्रा. लि. कंपनी व सार्वजनिक बांधकाम विभाग तयार नसल्यामुळे दापोरी गावामध्ये विविध प्रकारच्या गंभीर समस्या निर्माण झाल्या आहे. वेल्सपन इम्फ्रा प्रा. लि. कंपनी व दोषी अधिकाऱ्यांवर कार्यवाही करून ८ दिवसामध्ये अपूर्ण कामाला सुरुवात न झाल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा ईशारा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे तालुका उपाध्यक्ष तथा ग्राम पंचायत सदस्य रुपेश वाळके यांनी दिला आहे. मोर्शी तालुक्यातील दापोरी डोंगर यावली सालबर्डी पाळा मोर्शी रस्ता प्रजीमा ६६ कि.मी. ०/०० ते १५/६०० औधोगिक दृष्ट्या महत्वाच्या संत्राप्रकीया उद्योग व तिर्थक्षेत्रास जोडणाऱ्या रस्त्याची सुधारणा करण्या करीता हायब्रीड एन्यूटी प्रकल्पा अंतर्गत १ डीसेंबर २०१६



रोजी शासन निर्णय काढून प्रशासकीय मान्यता दिली मात्र ८ वर्षाचा कालावधी लोटून सुद्धा सदर रस्त्याचे काम अद्यापही पूर्णत्वास गेले नसल्या मुळे दापोरी येथील नागरिकांना अडचणीचा सामना करावा लागत आहे. सदर रस्त्याचे काम वेल्सपन इम्फ्रा प्रा. लि. कंपनीणे घेतले असून दापोरी सालबर्डी रस्त्याच्या बाजूचे दापोरी येथील गावातील सांडपाणी वाहून नेण्याकरिता काँक्रिट नालीचे बांधकाम निकृष्ट दर्जाचे करण्यात आले असून उर्वरित नालीचे बांधकाम अर्धवट सोडून दिल्यामुळे या मार्गावरील पावसाळ्यातील पाणी नागरिकांच्या घरात घुसून मोठे नुकसान होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. तसेच रस्त्याच्या लगत पेव्हर ब्लॉक बसविण्याचे काम सुद्धा कंपनीने केलेले नसल्यामुळे गावात जाणारे महत्वाचे रस्ते महत्वाचे रस्ते धोक्याचे झालेले आहे. जिल्हा परिषद शाळा, ग्राम पंचायत कार्यालय समोरील रस्त्याला लागून पेव्हर ब्लॉक बसविले नसल्यामुळे लहान विद्यार्थ्यांना शाळेत जाण्यास अरथडा निर्माण झाला असून सदर रोडच्या बाजूला नाली अप्रोच रोडचे काम पूर्ण करण्यात आले नसल्यामुळे गावातील नागरिकांना गावामध्ये जाण्यास अडचण निर्माण होत असून मोठा अपघात होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. या गंभीर प्रकाराबाबत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे तालुका उपाध्यक्ष तथा ग्राम पंचायत सदस्य रुपेश वाळके यांनी या गंभीर प्रकाराबाबत कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग व कंत्राटदार वेल्सपन कंपनीला अनेक वेळा निवेदन देऊन कळविले होते. मात्र सार्वजनिक बांधकाम विभाग व संबंधित कंत्राटदार यांनी तक्रारीला केराची टोपली दाखविल्यामुळे तक्रारीची दखल कोणीही घेतांना दिसत नसल्यामुळे सार्वजनिक बांधकाम विभाग संबंधित कंत्राटदाराच्या विरोधात रोष निर्माण होतांना दिसत आहे.

# २०२४–२५ च्या ३७४ कोटी २१ लक्ष रूपये खर्चाला मान्यता

## सर्वांगीण विकासासाठी नियोजनात अधिकाधिक कामांचा समावेश करा – पालकमंत्री ड. आकाश फुंडकर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.६अकोला,**
जिल्हा वार्षिक योजनेत २०२४–२५ या वर्षात मार्च अखेरपर्यंत ३७४ कोटी २१ लक्ष रु. खर्चाला आज जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत मान्यता देण्यात आली.

जिल्ह्यात सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने पुढील काळासाठी अधिकाधिक व व्यापक कामांचे नियोजन करून प्रस्ताव सादर करावेत व वेळेत प्रक्रिया पूर्ण करून कामांना चालना द्यावी, असे निर्देश राज्याचे कामगार मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री ड. आकाश फुंडकर यांनी आज येथे दिले.

जिल्हा नियोजन समितीची बैठक पालकमंत्र्यांच्या अध्यक्षतेत नियोजन भवनात झाली. आमदार रणधीर सावरकर, आमदार प्रकाश भारसाकळे, आमदार हरीश पिंपळे, आमदार नितीन देशमुख, आमदार साजिद पठाण, आमदार वसंत खंडेलवाल, आमदार अमोल मिटकरी, आमदार किरण सरनाईक, जिल्हाधिकारी अजित कुंभार, पोलिस अधीक्षक अर्चित चांडक, प्र. जि.प मुख्य कार्यकारी अधिकारी मनोज जाधव, जिल्हा नियोजन अधिकारी राजेश सोनखासकर आदी उपस्थित होते.

सर्वसाधारण योजनेत २७० कोटी ७७ लक्ष रुपये, अनुसूचित जाती उपयोजनेत ८७ कोटी ९८ लक्ष रुपये, आदिवासी उपयोजनेत १५ कोटी ४५ लक्ष रु. खर्चाला मान्यता देण्यात आली. सभेचे इतिवृत्त कायम करण्यासह अनुपालनाबाबत चर्चा झाली.



पालकमंत्री ड. फुंडकर म्हणाले की, जिल्ह्यातील विविध यंत्रणांनी नियोजन समितीच्या निधीतून करावयाच्या विकासकामांचे नियोजन काटेकोर करावे, विहित वेळेत कामे पूर्ण होतील याची खबरदारी घ्यावी. प्रशासकीय, तांत्रिक मान्यतांच्या प्रक्रियेला विलंब होता कामा नये. त्यादृष्टीने कार्यवाहीचा वेग वाढविण्याचे निर्देश त्यांनी दिले.

ते पुढे म्हणाले की, कृषी उत्पादनांचे लिंकिंग होत असल्याबाबत मोठ्या प्रमाणावर तक्रारी येत आहेत. त्यामुळे थेट कंपन्यांवर गुन्हे दाखल करावेत. पंचनाम्याची रीतसर प्रक्रिया पूर्ण न केल्याबद्दल एचडीएफसी एर्गोविरोधात पीक विमा कंपनीविरोधात गुन्हा दाखल आहे. या कंपनीने त्यानंतर सादर केलेले खोटे पंचनामे कृषी विभागाने पोलीसांकडे दाखल करावेत व पोलीसांनी याबाबत जबाबदार व्यक्तींवर कठोर कारवाई करावी. शेतक–यांच्या प्रश्नांबाबत हयगय खपवून घेणार नाही, असा इशारा पालकमंत्र्यांनी दिला.

खतांच्या पुरवठ्याबाबतच्या तक्रारींचे तत्काळ निवारण करावे. कोचिंग क्लासेसच्या इमारती सुरक्षित होण्यासाठी फायर ऑडिट असणे आवश्यक असल्याची मागणी आहे. त्यानुसार कार्यवाही व्हावी, असेही निर्देश त्यांनी दिले. अनुपालनाच्या अनुषंगाने विविध बाबींचा आढावा घेण्यात आला.

सन २०२५–२६ या वर्षात सर्वसाधारण योजना, अनुसूचित उपयोजना, आदिवासी उपयोजना यांचा ४३७ कोटी ५१ लक्ष रू. मंजूर नियतव्यय आहे. त्यानुसार कामांच्या मान्यतांची कार्यवाही लवकरात लवकर पूर्ण करण्याचे निर्देश त्यांनी दिले. यावेळी मुख्यमंत्री कृती कार्यक्रम टप्पा २ अंतर्गत विभागीय व राज्यस्तरावर बक्षीस मिळवणाऱ्या कार्यालय प्रमुखांचा सन्मान पालकमंत्री ड. फुंडकर यांच्या हस्ते करण्यात आला.

# मोर्शी तालुका शेतकी खरेदी-विक्री संस्था ठप्प!

## सभापतीचा राजीनामा शेअरधारक व कर्मचारी संकटात

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.६शिरखेड-** मोर्शी तालुक्यातील प्रमुख सहकारी संस्था 'मोर्शी तालुका शेतकी खरेदी विक्री संस्था सध्या गंभीर आर्थिक अडचणीत सापडली असून, संस्थेचे सर्व व्यवहार ठप्प झाले आहेत. पेक्षा अधिक शेअरधारकांची गुंतवणूक अडकली असून शेतकरी, कर्मचारी आणि गुंतवणूकदार मोठ्या संकटात सापडले आहेत.




संस्थेतील आर्थिक अनियमिततेची मालिका समोर येत असतानाच सभापती प्रा. प्रभाकर जवंजाळ यांनी नुकताच राजीनामा दिला आहे. उपसभापती गंभीर आजारी असल्यामुळे संस्थेचे नेतृत्व कोसळले आहे. यामुळे कोणतेही महत्त्वाचे निर्णय घेणे अशक्य झाले आहे. सहकारी संस्थेच्या माध्यमातून दरवर्षी शेतकऱ्यांना खते, बियाणे, औषधे इत्यादींचा पुरवठा केलाजात असे; मात्र यंदा संस्थेची आर्थिक स्थिती ढासळल्याने खरिपाच्या तोंडावर आवश्यक शेतमाल मिळेनासा झाला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना खासगी विक्रेत्यांकडे जावे लागत आहे, जेथे दरही अधिक आहेत. संस्थेत शेअर घेऊन गुंतवणूक केलेल्या सुमारे ५००० शेअरधारकांची लाखो रुपयांची रक्कम अडकली आहे.परतावा मागितला असता संस्थेकडे देण्यासाठी निधीनाही, असे स्पष्ट करण्यात आले.

यामुळे गुंतवणूकदारांमध्ये तीव्र नाराजी असून, काहींनी आंदोलनाचा इशारा दिला आहे.

स्थानिक शेतकरी संघटना आणि सामाजिक कार्यकर्त्यांनी याप्रकरणी शासनाने तातडीने चौकशी करून जबाबदारांवर कारवाई करावी, संस्थेला आर्थिक मदत यावी आणि व्यवस्थापनाची पुनर्रचना करावी, अशी मागणी केली आहे.

### कर्मचारीही पगाराशिवाय

संस्थेतील कर्मचाऱ्यांचे महिन्यांपासून पगार थकले असून, त्यांच्यावर उपासमारीची वेळ आली आहे. निवृत्तिवेतन, पीएफ आणि इतर सुविधा बंद झाल्यामुळे कर्मचाऱ्यांचे कुटुंबीयदेखील मोठ्या अडचणीत आहेत.-

# राष्ट्रसंतांना अभिवादन करून होणार गुरुकुंजात आंदोलनाची सुरुवात

# शेतकरी, दिव्यांगांच्या प्रश्नासाठी ८ जूनपासून बच्चू कडू यांचे अन्नत्याग

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.६ गुरुकुंज मोझरीः** शेतकरी, शेतमजूर व दिव्यांग, निराधार यांच्या यांच्या प्रलंबित असलेल्या प्रश्नांकडे शासन लक्ष देत नाही, या विरोधात प्रहार संघटनेचे संस्थापक अध्यक्ष तथा माजी आमदार बच्चू कडू यांनी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या महासमाधी स्थळाचे दर्शन घेऊन गुरुकुंजात प्रहार जनशक्ती पक्षाच्या वतीने बेमुदत अन्नत्याग आंदोलन करणार आहे. ८ जूनपासून या आंदोलनाला सुरुवात होणार आहे.



आज राज्यातील लाखों शेतकरी कर्जाच्या ओझ्याखाली दबले आहे. शेतकऱ्यांच्या कर्जाला हमीभाव मिळत नसल्याने त्यांचे उत्पन्न शून्याच्या आसपास पोहोचले आहे. दिव्यांग अपंग, निराधारांना आजही केवळ १५०० रुपये तुटपुंज्या मानधनावर जगावं लागतं. कर्जमाफी व दिव्यान बांधवांना किमान ६००० रुपये मानधन मिळवून देण्यासाठी माजी आ. बच्चू कडू यांच्या नेतृत्वात गुरुकुंज मोझरी येथे शेतकरी, दिव्यान, निराधार वृद्ध व प्रहार पक्षातील शेकडो कार्यकर्त्या समवेत बेमुदत अन्नत्याग आंदोलनास सुरुवात करण्यात येणार आहे दरम्यान शेतकऱ्यांची कर्जमाफी करा. दिव्यांग व महिलांना किमान ६ हजार रुपये मानधन द्या, नरेगावरील मजुरी ५०० रुपये करा अशा विविध मागण्यांसाठी बच्चू कडू गुरुकुंजातील राष्ट्रीय महामार्गालगत असलेल्या श्री गुरुदेव विद्यामंदिर शाळेच्या भव्य प्रागणात अनत्याग आंदोलन करणार आहे. सरकार जोपर्यंत या प्रमुख मागण्यासंदर्भात आपली भूमिका स्पष्टकरत नाही, तोपर्यंत हे आंदोलन सुरु ठेवण्याची भूमिका बच्चू कडू यांनी प्रसिद्धीस दिलेल्या एका पत्रकाद्वारे स्पष्ट केली आहे.

दरम्यान अमरावती शहरातील संत गाडगेबाबा समाधी मंदिर ते गुरुकुंज (मोझरी) अशी १५ते २० हजार शेतकरी व प्रहार कार्यकर्त्यांची बाईक रॅली काढून दरम्यान गुरुकुंज मोझरी आंदोलनस्थळी सभा घेऊन सभेचे रूपांतर आंदोलनात करण्यात येईल. या आंदोलनात राज्यभऱ्यातून प्रहारचे कार्यकर्ते सहभागी होणार असून त्याकरिता गुरुकुंजातील विद्यामंदिर शाळेच्या प्रांगणात आंदोलनस्थळी भव्य सभामंडप उभारण्यात आला असल्याची माहिती तिवसा तालुका प्रहार संघटनेचे नेते व माजी जिल्हापरिषद सदस्य संजय देशमुख यांनी दिली आहे.

# पद्मश्री पुरस्कार विजेते डॉ. कंचन जवंजाळ यांचा प्रवीण पोटे पाटील यांच्या हस्ते सत्कार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.६अमरावती** पद्मश्री पुरस्काराने सन्मानित डॉक्टर कंचन खुशालराव जवंजाळ, नोडल अधिकारी, आरोग्य विभाग, अमरावती यांनी माजी आ. प्रविण पोटे पाटील यांच्या जनसंपर्क कार्यालयात सदिच्छा भेट दिली. माजी आ. प्रविण पोटे पाटील यांनी यावेळी पद्मश्री पुरस्काराने सन्मानित डॉक्टर कंचन खुशालराव जवंजाळ यांचा शाल श्रीफळ व सन्मानचिन्ह देऊन सत्कार केला

डॉ. कंचन जवंजाळ यांच्या आरोग्य क्षेत्रातील दीर्घकालीन योगदान, समाजसेवासाठी त्यांना भारत सरकारने पद्मश्री पुरस्काराने गौरविले आहे. ही अमरावती करांसाठी गौरवाची बाब आहे त्यांचे कार्य विशेषतः ग्रामीण आरोग्य सेवा, मातृत्व आरोग्य आणि जनजागृती अभियानांमध्ये उल्लेखनीय ठरले आहे असे प्रतिपादन यावेळी मा. आ. प्रविण पोटे पाटील यांनी केले .यावेळी श्रेयशदादा पोटे पाटील, प्रकाशजी पुंड, संजय कटारिया व मान्यवर उपस्थित होते.



# रेल्वे सुरक्षा दलाकडून विशेष मोहीम



**विदर्भ प्रजासत्ताकदि.६अमरावती** बडनेरा रेल्वेस्टेशन आणि त्याअंतर्गत येणाऱ्या कार्यक्षेत्रात, आरपीएफ पोस्ट बडनेराद्वारे विशेष जनजागृती मोहीम राबविण्याबाबत ४ जून २०२५ रोजी, मुख्यालयाकडून मिळालेल्या आदेशानुसार, बडनेरा रेत्वेस्टेशन आणि त्याअंतर्गत येणाऱ्या कार्यक्षेत्रात, आरपीएफ पोस्ट बडनेरा येथील कर्मचाऱ्यांसह, मुख्यालयाकडून मिळालेल्या आदेशानुसार, बडनेरा रेल्वेस्टेशन आणि त्याअंतर्गत येणाऱ्या कार्यक्षेत्रात प्रवाशाना आणि गावातील रहिवाशांना एकत्र करून एक विशेष जनजागृती मोहीम राबविण्यात आली. ज्या अंतर्गत प्रवासा दरम्यान योग्य कारणाशिवाय साखळी ओढू नये, कोणत्याही अज्ञात व्यक्तीकडून कोणत्याही प्रकारचे पेय किंवा अन्नपदार्थ घेऊ नये आणि ढजझइ/दरोडा सारख्या घटना घडू नयेत, याबद्दल माहिती देऊन प्रवाशांना सतर्क करण्यात आले.बडनेरा स्टेशन हद्दीतील किमी क्रमांक (६५२/००) येथील शिवनी गाव परिसरात जाऊन रेल्वे लाईनभोवतीच्या रहिवाशाना एकत्र केले आणि त्यांचे पाळीव प्राणी आणि मानवांना रेल्वे लाईनपासून दूर ठेवण्याबद्दल माहिती दिली. जेणेकरून उठज/चठज सारख्या अप्रिय घटना टाळता येतील प्रवासी आणि रहिवाशांना कायदेशीर परवानगीशिवाय रेल्वे परिसरात प्रवेश करू नका आणि रेल्वेलाईन ओलांडू नका, जेणेकरून अतिक्रमणसारख्या घटनाघडू शकतात. ज्यामध्ये, विशेषतः रहिवाशांमधील मुलांना एकत्र केले गेले आणि रेल्वे प्रशासन आणि प्रवाशांच्या जीवित आणि मालमत्तेचे नुकसान होऊ नये म्हणून गाड्यांवर दगडफेक करू नका, असा सल्ला देण्यात आला. जर कोणी वरील प्रकरणानुसार रेल्वे प्रशासनाच्या नियमांचे उल्लंघन केले, तर त्याच्याविरुद्ध रेल्वे कायद्याच्या कलमानुसार कारवाई केली जाईल, असे स्पष्ट करून जागरूकता मोहीम राबविण्यात आली.

# नवाथे नगर गल्ली १ मधील घरफोडीचा पोलिसांनी लावला छडा

# जळगाव जिल्ह्यातून दोन आरोपींना बेड्या

**विदर्भ प्रजासत्ताकदि.५ अमरावती** नवाथे नगर गल्ली नं. १ मध्ये विनायक मुर्ती पलनीस्वामी हे विजु बवाने यांच्या घरी भाड्याने राहतात. १५ ते ३१ मे दरम्यान ते मुळ तामीळनाडूतील मुळगावी गेले असता १,४४,००० रूपये व दोन लॅपटॉप प्रत्येकी ३५,००० असा एकूण २ लाख १४ हजार रुपयांचा मुद्देमाल चोरट्यांनी चोरून नेला होता. या प्रकरणी राजापेठ पोलिस स्टेशनला तक्रार दाखल केल्यानंतर वेगाने तपासचक्रे फिरविण्यात आली आणि जळगाव जिल्ह्यातून दोन आरोपींना बेड्या ठोकण्यात आल्या. त्यांच्याकडून १.७० लाखांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.




विनायक मुर्ती पलनीस्वामी नवाथे, गल्लीनं ०१, अमरावती हे मुळ राहणारे तमीळनाडुचे राहणारे आहेत. अमरावतीला फळ विकीचा व्यवसाय करतात. १५ मे रोजी घराला कुलूप लावून मुळ गावी गेले आणि ३१ मे रोजी घरी परत आले असता त्यांना घरातील मागील दराचे लॉक तुटलेले दिसले. घरातील सामानाची पाहणी केली असता त्यांना नगदी १,४४,००० रूपये व दोन लॅपटॉप प्रत्येकी ३५,००० असा एकूण २.१४,००० रू.चा मुद्देमाल चोरीला गेल्याचे लक्षात आले. राजापेठ पो. स्टे. ला अपराध कमांक २६४ / २०२५ कलम ३३१ (३).३०५ (अ), ६१ (२) भा. न्या. सं अन्वये दाखल करून तपासात घेतला.या प्रकरणाच्या या तपासामध्ये घटनास्थळावरील सिसीटीव्ही फुटेज व गुप्त बातमीदारांचे माहीती वरून संशयित आरोपी हा ग्राम चुचाळे ता. चोपडा, जि. जळगाव येथील रहिवासी असल्याची माहीती मिळाली. राजापेठ पोलिसस्टेशनचे वपोनि पुनीत कुलट यांचेआदेशाने डि बी पथक यांनी चुचाळे ता. चोपडा, जि. जळगाव येथे आरोपी विठ्ठल भालचंद्र पाटील, वय ४१ वर्षे, रा ग्राम चुचाळे ता. चोपडा, जि. जळगाव आणि राज लिंगम पिचमुथु, वय २१ वर्षे, रा. आदर्श नगर, चोपडा, जि. जळगाव या दोघांना अटक केली. त्यांच्याकडून दोन लॅपटॉप प्रत्येकी कि. अं. ३५,०००रु. गुन्हा करते वेळी वापरलेली पल्सर गाडी कमांक जि. जि. ०१ व्हि. के. १५०१ कि अं ८०,००० व दोन मोबाईल प्रत्येकी १०,००० रू. असा एकूण १,७०,००० रूपयांचा मुददेमाल जप्त करण्यात आला आहे.-

# अमरावती रेल्वे स्थानकाचे प्रधान तिकीट परीक्षक लीलाधर कुडे यांचा सेवानिवृत्ती कार्यक्रम संपन्न

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.६अमरावती** -स्थानिक अमरावती रेल्वे स्थानक येथे प्रधान तिकिट परीक्षक लीलाधर कुडे यांना सेवानिवृत्ती निमित्त भावपूर्ण निरोप देण्यात आला. गेल्या २२ वर्षापासून भारतीय रेल्वेमध्ये प्रामाणिकपणे आपली सेवा लीलाधर कुडे प्रदान तिकीट परीक्षक यांनी बजावली असून त्यांनी आपल्या कार्यकाळात अतिशय शिस्तीने प्रामाणिकपणे आपली सेवा दिली.व सर्वांशी अतिशय प्रेमळ पणे वागून त्यांच्या या प्रेमळ स्वभावामुळे ते सर्वपरिचित झाले होते. कार्यक्रमात राष्ट्रीय रेल्वे महिला प्रवासी संघटनेच्या विदर्भ प्रदेशाध्यक्ष मनीषा टाकसाळ यांच्यातर्फे लीलाधर कुडे यांचा भावपूर्ण सत्कार करण्यात आला.यावेळी मनीषा टाकसाळ यांनी बोलताना सांगितले की अशा कर्तव्यनिष्ठ अधिकाऱ्यामुळे भारतीय रेल्वेचा खरा गाभा मजबूत राहते. कार्यक्रमाचे आयोजन अमरावती रेल्वे स्टेशनचे कर्तव्यदक्ष प्रबंधक महेश लोहकरे यांच्या नेतृत्वात अतिशय शिस्तप्रिय पद्धतीने करण्यात आले होते. या कार्यक्रमाला एम.एस. लोहकरेस्टेशन मास्तर अमरावती, कुऱ्हाडे साहेब मुख्य तिकीट निरीक्षक अमरावती, चारडिवे साहेब मुख्य आरक्षण पर्यवेक्षक, बॅनर्जी साहेब रेसवेरशन परीक्षक ,सूर्यवंशी साहेब मुख्य आरोग्य निरीक्षक, सय्यद मंझूर कार्यालय अधीक्षक, मुकेश आईदासांनी वरिष्ठ लिपिक, अर्चना सांगोले



कार्यालय अधीक्षक, रामटेके साहेब वरिष्ठ विभागीय अभियंता कोचिंग अँड वेगन, विश्वकर्मा साहेब वरिष्ठ विभागीय अभियंता इलेक्ट्रिकल,डी.बी.देशराम साहेब निरीक्षक वरिष्ठ कार्यालय अधीक्षक, रईस भाई मुख्य यांत्रिक कर्मचारी ,उपस्थित होते.

# लग्न मुहूर्त ओसरले; वांग्याचे दर घसरले!

# २० रुपये किलो दराने होतेय विक्री

## उत्पादक शेतकऱ्यांना बसतोय फटका

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.६मोर्शी-** मान्सूनला सुरुवात होणार असून, लग्नसराई आटोपतीवर आले आहेत. आता फारसे लग्नाचे मुहूर्त नसल्याने भाजीचा राजा असलेल्या वांग्याचे भाव ५० रुपयांवरून थेट २० रुपयांपर्यंत प्रतिकिलो दरापर्यंत उतरले आहेत. याचा वांगी उत्पादकांना चांगलाच फटका बसला आहे.ग्रामीण भागातील लग्नात आलू, वांगे व डाळभाजी या दोन भाज्या हमखास बनवल्या जातात. त्यामुळे लग्नाच्या कालावधीत वांग्यांची मागणी मोठ्या प्रमाणात होते. भाजीपाला उत्पादक शेतकरी लग्नतिथीवर डोळा ठेवून वांगी लागवड करीत असतात.



लग्नतिथी असल्या की लग्नाचा बार उडतो. यावर्षात एप्रिल महिन्यात बरेच लग्नमुहूर्त होते. त्यानंतर मे महिन्याच्या मध्यंतरापासून लग्नतिथी फार कमी असल्याने वांग्याचे भाव आपोआपच गडगडले.वांग्याला एप्रिल महिन्यात ५० रुपये किंवा त्यापेक्षा अधिक दर मिळत होता. आता वांग्याचे दर घसरले असून १५ ते २० रुपये किलो दर मिळत आहे.परिणामी, भाजीपाला उत्पादकांचा चांगलाच हिरमोड झाला आहे. या आठ महिन्यांत भाजीपाला उत्पादकांचा उत्पादन खर्च निघणे कठीण झाले आहे. पावसाळा सुरू झाल्यानंतर वांग्याच्या उत्पादनात आपोआप घट होते. पावसाळी वातावरण वांग्याला फारसे योग्य ठरत नाही. त्यामुळे पावसाळ्यापूर्वी भाववाढीची अपेक्षा शेतकरी करीत आहेत.ग्रामीण भागात कोणताही कार्यक्रम असो, त्या कार्यक्रमात आलू- वांग्याची भाजी ठरलेली आहे.ग्रामीण भागात प्रामुख्याने उन्हाळ्यातच कार्यक्रम केले जातात. त्यामुळे उन्हाळ्यामध्ये वांग्याची मोठ्या प्रमाणातग्रामीण भागात प्रामुख्याने उन्हाळ्यातच कार्यक्रम केले जातात. त्यामुळे उन्हाळ्यामध्ये वांग्याची मोठ्या प्रमाणात मागणी वाढत असल्याचे दिसून येते. आता मान्सूनची चाहूल लागली असून, वांग्याची मागणी आपसूकच कमी झालेली दिसून येत आहे.

# १० लाखांनी केली फसवणूक

## तिघांविरुध्द गुन्हाः मालमत्ता खरेदीस टाळाटाळ

**विदर्भ प्रजासत्ताकदि.६अमरावती :**
भूखंड खरेदीच्या व्यवहारात संशयित तिघांनी दहा लाखांनी फसवणूक केली आहे. गाडगेनगर ठाण्याच्या हद्दीत ही घटना घडली. सतीश जवाहरलाल कनोजिया (४९) रा. विद्युत कॉलनी, अमरावती असे फसवणूक झालेल्या व्यक्तीचे नाव आहे.


संशयित नीलिमा योगेश खारकर, केतन योगेश खारकर व कैथीलीयोगेश खारकर यांच्याविरुध्द फसवणूक व विश्वासघातप्रकरणी गाडगेनगर ठाण्यात गुन्हा दाखल झाल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले. कनोजिया यांचा खारकर यांच्यासोबत एक भूखंड विकण्याचा व्यवहार केला होता. त्यासंदर्भात १८ ऑक्टोबर २०२३ रोजी सतीश कनोजिया यांनी कोटक महिंद्रा बँक येथून २ लाख रुपये व २ डिसेंबर २०२५ रोजी ८ लाख रुपये,असा एकूण १० लाख रुपयांचा संपूर्ण भरणा संशयित कैथिली योगेश खारकर यांच्या ॲक्सिस बँकेच्या खात्यामध्ये केला होता. २९ एप्रिल २०२४ रोजी सदर मालमत्तेची नोटरी करण्यात आली होती. त्यानंतर निर्धारित वेळेमध्ये खरेदी करण्याचे ठरले होते.मुदतीत खरेदी व्हावी म्हणून सतीश कनोजिया यांनी खारकर यांच्यासोबत संपर्क साधला होताः परंतु संशयितांनी कनोजिया यांचा मोबाईल क्रमांक ब्लॉक करून ठेवला होता. त्याचा कोणताही कॉल संशयितांनी रिसीव्ह केला नाही. संशयित तिघांनी विश्वासघात करून आपली फसवणूक केली, असा आरोप कनोजिया यांनी तक्रारीत केला आहे.-

# मनपाला इलेक्ट्रिक बसेससाठी शासनाने कोंडेश्वर येथे दिली दोन हेक्टरवर जागा

विदर्भ प्रजासत्ताक
दि.६अमरावती

मनपाला इलेक्ट्रिक बसेसचे चार्जिंग स्टेशन व डेपोसाठी महसूल विभागाच्या मंजुरीनंतर जिल्हा प्रशास्नाने कोंडेश्वर नाका येथील फिशरीज हबला लागून असलेली २ हेक्टर जागा नुकतीच दिली आहे. त्यामुळे आता येथे डेपो आणि इलेक्ट्रीक सप्लाय पोहोचवण्यासाठी निविदा प्रक्रिया सुरू केली जाणार आहे. त्यामुळे येत्या काही महिन्यांत शहरातील रस्त्यांवर इलेक्ट्रिक सिटी बसेस धावताना दिसतील.

शुद्ध हवेचे शहर म्हणून अमरावतीला प्रथम पुरस्कार मिळाला आहे. ही शुद्धता पीएमई बसेस रस्त्यांवर धावायला लागल्यानंतर कायम राहणार आहे. केंद्र शासनानेच इलेक्ट्रिक बसेस देण्याची तयारीदर्शवून तत्काळ प्रस्ताव सादर करण्यास इलेक्ट्रिक सांगितले होते. त्यानंतर मनपाने प्रस्ताव पाठवला. केंद्र सरकारने अमरावतीसाठी पीएमई-बस योजनेतर्गत ५० बसेस मंजूर केल्या. या बसेसच चार्जिंग स्टेशन तसेच डेपोसाठी मनपाने शहरात जागेचा शोध घेतला. परंतु, त्यांना आवश्यकतेनुसार जागा मिळाली नाही. अखेर महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे जिल्ह्याचे पालकमंत्री झाल्यानंतर त्यांच्याकडे मनपाने प्रस्ताव पाठवून कोंडेश्वर नाका येथील फिरशील हबला लागून असलेल्या २ हेक्टर जागेची मागणी केली. त्या जागेला राज्याच्या महसूल मंत्रालयाने मंजुरी दिल्यानंतर जिल्हा प्रशासनाने ती जागा कागदोपत्री मनाला हस्तांतरित केली. त्यामुळे येथे ५० इलेक्ट्रिक बसेस उभ्या करता येतील, त्यांची देखभाल दुरुस्ती करता येईल यासाठी डेपो, चार्जिंग स्टेशन, कार्यशाळेचे निर्माण केले जाणार आहे.



## जिल्हा प्रशासनाने कागदोपत्री जागा हस्तांतरित केली



महसूल विभागाकडे आम्ही कोंडेश्वर नाका येथील फिरशील हबला लागून असलेली २ हेक्टर जागा होती. २ हेक्टर जागा इलेक्ट्रिक बसेसच्या चार्जिंग स्टेशनसाठी मागितली महसूल मंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बाककुळे यांनी जागा देण्यास मान्यता दिल्यानंतर जिल्हा प्रशासनाने तत्काळ कारवाई करून नुकतीच आम्हाला कागदोपत्री जागा हस्तांतरित केली आहे.

**सचिन कलंत्रे,**
**आयुक्त तथा प्रशासक, मनपा.**

# गोवंश तस्करी रोखण्यासाठी जिल्ह्याच्या सीमेवर नाकाबंदी

## ग्रामीण पोलिसांकडून जिल्हाभरात कडेकोट पोलिस बंदोबस्त

विदर्भ प्रजासत्ताक
दि.६अमरावती



बकरी ईदच्या पार्श्वभूमीवर ग्रामीण पोलिसांनी कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी कडेकोट बंदोबस्त नेमला आहे. या दरम्यान मध्यप्रदेशातून गोवंश तस्करी होऊ नये किंवा झाल्यास रोखता यावी, यासाठी महाराष्ट्र मध्यप्रदेश सीमेवर तब्बल आठ ठिकाणी नाकाबंदी सुरू केली आहे.

ग्रामीण पोलिसांनी शेंदुरजना घाट पोलिस ठाण्याच्या हद्दीत दोन ठिकाणी तसेच परतवाडा, चिखलदरा, धारणी, ब्राह्मणवाडा थडी ठाण्याच्या हद्दीत प्रत्येकी एक व अन्य दोन ठिकाणी अशा एकूण आठ ठिकाणी चोविस तास पोलिसांची तैनाती ठेवली आहे. यापूर्वी अनेकदा जिल्ह्यात मध्यप्रदेशातून मोठ्या प्रमाणात गोवंश जिल्ह्यात आणले जात असल्याचे पोलिसांच्याच कारवाईतून समोर आले होते. दरम्यान बकरी ईदच्या काळात गोवंश तस्करी होऊ नये, म्हणून ग्रामिण पोलिसांनी ही विशेष खबरदारी घेतली आहे. याव्यतिरिक्त प्रत्येक ठाण्याच्या हद्दीत शांतता समिती तसेच गोरक्षक यांच्या संयुक्त बैठका घेऊन पोलिसांना सहकार्य करण्याचे व समन्वय राखण्याचे आवाहन करण्यात आले आहे. बकरी ईद दरम्यान सर्व नागरिकांकडून सामाजिक सलोखा, स्वच्छता राहण्याचे आवाहन पोलिसांनी केले आहे. येणाऱ्या काळात सामाजिक एकोप्याचे वातावरण कायम ठेवून एकमेकांशी सौजन्यपूर्ण वागणूक ठेवावी, सोशल मीडियावर कोणत्याही प्रकारच्या खोट्या माहिती प्रसारित करू नये, तसेच अफवांवर विश्वास ठेवू नये. तसेच खात्री केल्याशिवाय कोणतेही संदेश इतरांना पाठवू नये, याउलट सोशल मीडियावर आपल्याला खोटी माहिती प्रसारित झाल्याचे लक्षात येताच तत्काळ सायबर पोलीस ठाणे किंवा नजीकच्या पोलीस स्टेशनला माहिती द्यावी, असेही आवाहन पोलिसांनी केले. शांतता व संयम राखून सण साजरा करावा, कोणाच्याही भावना दुखावणारे वर्तन कोणीही करू नये. स्थानिक प्रशासनाने ठरवलेल्या नियमांचे काटेकोर पालन करावे, रस्त्यावर किंवा इतर सार्वजनिक जागी स्वच्छता राहील, याची काळजी घ्यावी, असे आवाहन ग्रामीण पोलिसांच्या वतीने करण्यात आले आहे.

### चोविस तास पोलिस तैनात



आम्ही मागील पंधरा दिवसांपासून मध्यप्रदेशातून जिल्ह्यात येणाऱ्या सर्व आठ ठिकाणी चोविस तास नाकाबंदी सुरू केली आहे. त्या ठिकाणी पोलिस तैनात आहेत. या व्यतिरिक्त जिल्ह्यात प्रत्येक पोलिस ठाण्याच्या हद्दीत कडेकोट पोलिस बंदोबस्त तैनात केला आहे.

**विशाल आनंद, पोलिस अधीक्षक**
**अमरावती ग्रामिण**

# जिल्हा परिषदेत आईच्या नावे वृक्षारोपण

## अधिकारी-कर्मचाऱ्यांनी जागतिक पर्यावरण दिनी लावली झाडे



विदर्भ प्रजासत्ताक
दि.६अमरावती

जागतिक पर्यावरण दिनाच्या निमित्ताने आज, गुरुवारी जिल्हा परिषदेच्या वतीने 'एक पेड माँ के नाम' या संकल्पनेवर आधारित वृक्षारोपण कार्यक्रम घेण्यात आला. जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी संजीता महापात्र यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले.

यावेळी सर्व खातेप्रमुख उपस्थित होते.प्रत्येक अधिकारी व कर्मचाऱ्याने आपल्या आईच्या सन्मानार्थ एक वृक्ष लावून पर्यावरण संवर्धनाबाबत सामाजिक बांधिलकी व्यक्त करण्याचा हा प्रयत्न आहे. त्यानिमित्ताने जिल्हा परिषदेच्या परिसरात अनेक झाडे लावण्यात आलीय यावेळी जि.प. च्या अतिरिक्त सीइओ तथा डीआरडीएच्या प्रकल्प संचालक प्रीती देशमुख, डेप्युटी सीईओ बालासाहेब बायस, मुख्य लेखा व वित्त अधिकारी (कॅफो) दिनेश ठाकरे, कार्यकारी अभियंता दिनेश गायकवाड, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी डॉ. पुरुषोत्तम सोळंके, शिक्षणाधिकारी अरविंद मोहरे व प्रिया देशमुख, कृषि विकास अधिकारी मलप्पा तोडकर, प्रभारी डेप्युटी सीईओ सुनील गवई, संजय खारकर, अभियंता प्रमोद कराळे, पल्लवी मांडवगडे, प्रशासन अधिकारी निलेश तालन, विजय कविटकर, गजानन पाचपोर, दिनेश तांबडे, सीइओंचे स्वीय सहायक ज्ञानेश्वर घाटे यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या उपक्रमातून पर्यावरण संवर्धनासोबतच आईप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याचा अभिनव प्रयत्न जिल्हा परिषदेच्या वतीने सुरु करण्यात आला असून तो यापुढेही कायम केला जाणार आहे. या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# आम्ही तंबाखू खाणार नाही !!

## ग्रामीण रुग्णालयामध्ये 'तंबाखू नकार महिना'



विदर्भ प्रजासत्ताक
दि.६चांदुर रेल्वे

राज्याचा सार्वजनिक आरोग्य विभाग आणि जिल्हा सामान्य रुग्णालयाच्या निर्देशानुसार येथील ग्रामीण रुग्णालयातर्फे 'तंबाखू नकार महिना' राबविण्यात आला. यानिमित्ताने तालुक्यातील वेगवेगळी कार्यालये, महाविद्यालये आणि इतर ठिकाणी जनजागरण मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेंतर्गत येथील ट्रायडंट कॉलेज ऑफ नर्सिंग, नगर परिषद कार्यालय, दत्त मंदिर तसेच परिसरात आयोजित करण्यात आलेले गुरुदेव सेवा मंडळाचे उन्हाळी शिबीर आदी ठिकाणी भेट देऊन तंबाखूला नकार देण्याची प्रतीज्ञा वदवून घेण्यात आली. शिवाय तंबाखूजन्य पदार्थांच्या सेवनाला प्रतिबंध करणाऱ्या 'कोटापा' कायद्याची माहिती देण्यात येऊन याठिकाणी उपस्थित विद्यार्थी आणि नागरिकांची प्राथमिक मौखिक तपासणीही करण्यात आली. या सर्व कार्यक्रमांदरम्यान ग्रामीण रुग्णालयातील एनसीडी विभागाच्या समुपदेशक पुर्ती लाखोडे यांनी तंबाखूचे मानवी शरीरावर होणारे दुष्परिणाम याबाबत माहिती पुरविली. ग्रामीण रुग्णालयाच्या वैद्यकीय अधीक्षक डॉ. नम्रता सोनवणे यांच्या नेतृत्वात हे सर्व कार्यक्रम घेण्यात आले. तंबाखू नकार महिना अंतर्गत तालुक्याच्या विविध गावांतून आलेले ८५ लाभार्थी, नगर परिषदेचे ४९ अधिकारी-कर्मचारी व सफाई कर्मचारी तसेच नर्सिंग कॉलेजच्या १४५ विद्यार्थ्यांना अभियानाची माहिती देऊन तंबाखूजन्य पदार्थांपासून दूर राहण्याचे आवाहन करण्यात आले. या उपक्रमाला नगर पालिकेचे प्रशासक खंडारे, ट्रायडंट नर्सिंग कॉलेजचे अध्यक्ष निलेश विश्वकर्मा, गुरुदेव सेवा मंडळाचे प्रमोद गावंडे, रवींद्र साबळे, किरण राऊत यांनी वेळोवेळी भेटी देऊन प्रशंसा केली.

# गांधीग्रामच्या गुळपट्टीचा ब्रँड गेला सातासमुद्रापार

## गावात घरोघरी तयार होते गुळपट्टी, शेतकरी, कारागीर आणि उद्योजकांच्या हाताला काम

विदर्भ प्रजासत्ताक
दि.६गांधीग्राम

शुद्धतेची खात्री अन् स्वादाची हमी देणारी खास नैसर्गिक पद्धतीने बनवलेल्या अकोला तालुक्यातील अकोला-अकोट मार्गावरील गांधीग्राम (ता. अकोट) येथील गुळपट्टी एक ब्रँड बनत असून, तिची ख्याती आता साता समुद्रापार गेली आहे.आता या गुळपट्टीचा प्रवास केवळ देशातच नव्हे तर सातासमुद्रापार पोहचला असून, त्याच्या गोडव्याने देशी नव्हे तर परदेशी नागरिकांनाही भुरळ घातली आहे.या गुळपट्टी व्यवसायाच्या माध्यमातून शेतकरी, कारागीर आणि उद्योजकांच्या हाताला काम मिळाले आहे. गांधीग्राममध्ये गुळपट्टी बनवण्याची परंपरा ही अगदी ब्रिटिश काळापासून अस्तित्वात आहे. त्या काळात ऊस उत्पादकांनी आपले शेतमाल अधिक टिकाऊ आणि विक्रीस सोयीस्कर करण्यासाठी गुळ आणि गुळापासून गोड पदार्थ बनवण्यास सुरुवात केली. हा उपक्रम सुरुवातीला प्रमाणावर सुरू झाला.



### आता हाच आमचा मुख्य व्यवसाय

अमेरिका, चीन, दुबईला जाते गुळपट्टी आधी आमचा मूळ व्यवसाय शेती होता. आता गुळट्टीचा व्यवसायाने ते स्थान घेतले आहे. गुळपट्टीने आम्हाला आर्थिक समृद्ध केले आहे. गुळपट्टीचा उद्योग हा आमचा मूळ व्यवसाय बनला आहे. गावातील प्रत्येक घराघरात गुळपट्टी तयार केली जाते. आमची गुळपट्टी ही केवळ राज्यातच नव्हे तर अमेरिका, चीन, दुबईला सुद्धा पाठवली जाते.

**– विवेक फुरसुले, गुळपट्टी निर्माता आणि विक्रेता.**

गुळपट्टीमुळे आर्थिक समृद्धीच्या मार्गावर कधीकाळी शेतीप्रधान असलेले गांधीग्राम आता गुळपट्टीच्या व्यवसायामुळे आर्थिक समृद्धीच्या मार्गावर आहे. गावातील अनेक कुटुंबे या व्यवसायात गुंतली आहेत. शेतीसोबतच आता हा गोड पदार्थ गावातील प्रमुख उद्योग झाला आहे. त्यांना बाजारपेठ मिळाली आहे, त्यांचे उत्पन्न वाढले आहे. या गावाने आपल्या मेहनतीने आणि गोडव्याने एक आगळेवेगळे स्थान मिळवले आहे. आज गांधीग्राममध्ये तयार होणारी गुळपट्टी स्थानिक ब्रँड बनली आहे. गावात येणारे पर्यटक गुळपट्टी खरेदी करताना दिसतात.

# पोलिस अधीक्षकांचे आदेश; 'तो' अंमलदार सेवेतून अखेर निलंबित

विदर्भ प्रजासत्ताक दि.६अमरावती

मुलीवर बळजबरी करून बँड टच केल्याचा आरोप असलेल्या एका पोलिस अंमलदाराला सेवेतून निलंबित करण्यात आले. पोलिस अधीक्षक विशाल आनंद यांनी ५ जून रोजी सायंकाळी ते आदेश काढले. आरोप असलेला पोलिस अंमलदार ग्रामीण पोलिस दलाच्या आस्थेपनेवर असून सद्या प्रतिनियुक्तीवर अन्य एका शाखेत कार्यरत होता. दरम्यान, राजापेठ पोलिसांनी त्याला अटक करून गुरुवारी स्थानिक न्यायालयासमोर हजर केले. न्यायालयाने त्याला न्यायालयीन कोठडी सुनावली आहे. एका २४ वर्षीय मुलीने ४ जून रोजी राजापेठ पोलिस ठाणे गाठून तीच्या पोलिस पित्याविरूध्द तक्रार दिली होती. त्या तक्रारीवरून पोलिसांनी या प्रकरणी त्या पोलिस पित्याविरूद्ध बलात्कार, पोस्को व विनयभंगाचा गुन्हा दाखल केला होता. त्या प्रकरणाची संपुर्ण माहिती घेतल्यानंतर व तसा अहवाल शहर पोलिसांकडून गेल्यानंतर एसपींनी निलंबनाचे आदेश काढले आहे.

# दलित वस्तीचा निधी वळता केल्यावरून वादंग : डीपीसीच्या बैठकीत सत्ताधारी- विरोधी आमदारांत आरेकारे

विदर्भ प्रजासत्ताक
दि.६अकोला



अनुसूचित जाती उपयोजना व अनुसूचित जाती व नवबौद्ध वस्तीचा विकास करणे, या योजनेंतर्गत कामांचा ३६ कोटींचा निधी अन्य ठिकाणी वळता केल्याचे तीव्र पडसाद गुरुवारी झालेल्या जिल्हा नियोजन समितीच्या (डीपीसी) बैठकीत उमटले. शिवसेनेचे आ. नितीन देशमुख व भाजपचे आ. रणधीर सावरकर यांच्यात वाद झाला. आमदारांकडून आरे-कारेची भाषा वापरण्यात आल्याचे सूत्रांचे म्हणणे आहे. दोघेही खुर्चीवरुन उठून एकमेकांना उत्तर-प्रत्युत्तर देत होते. नंतर वाद मिटला; मात्र सभागृहाबाहेर भाजप-शिवसेनेचे कार्यकर्ते एकमेकांसमोर उभे ठाकले. दोन्ही बाजूने संघर्षाची स्थिती निर्माण झाली. धक्काबुक्कीही झाली. दोन्ही बाजूच्या कार्यकर्त्यांना आवरताना पोलिसांची प्रचंड दमछाक झाली. उर्वरित पान ३ डीपीसीच्या बैठकीत दलितवस्तीचा निधी वळता केल्यावरून जि.प.च्या अधिकाऱ्यांनी उत्तर दिले. आ. देशमुख यांनी चर्चेत भाग घेतला. ग्रामीण भागातील दलित वस्तींचा निधी मनपाकडे का वळता केला?, असा सवाल त्यांनी केला. यावरुन जि.प.च्या अधिकाऱ्यांनी माहिती सादर केली. त्यानंतर यात सत्ताधाऱ्यांकडून बाजू मांडण्याचा प्रयत्न झाला. त्यानंतर दोन्ही आमदारांमध्ये आरे-कारेची भाषा वापरण्यात आली.

अपशब्दांचा प्रयोग नाही : आ. रणधीर सावरकर आ. रणधीर सावरकर यांनी माध्यमांशी बोलताना आपली बाजू मांडली. बैठकीत अपेक्षित नसलेले दोन व्यक्ती चित्रीकरण करत असल्याचे लक्षात आल्याने त्यांना पालकमंत्र्यांनी बाहेर जाण्यास सांगितले. यावर आ. नितीन देशमुख यांनी आक्षेप घेतला. मीही बोलण्याचा प्रयत्न केला. यावरुन काहीसा वाद झाला. काहीसा आवाजही वाढला. मात्र दोन्ही बाजूने अपशब्द, शिविगाळ झाली नाही. नंतर बैठक व्यवस्थित झाली, असाही दावा सावरकर यांनी केला.

# परतवाड्यात दोन गटांत हाणामारी

## आठवडी बाजारातील घटना, तीन जण जखमी

विदर्भ प्रजासत्ताक दि.६परतवाडा

परतवाडा येथील नृसिंह मंदिराजवळ भरणाऱ्या आठवडी बाजारात क्षुल्लक कारणावरून दोन गटांत वादानंतर हाणामारी झाली. त्यात चाकू, काठीने हल्ला करण्यात आला. त्यामध्ये दोन्ही गटातील तिघे जखमी झाले.

परतवाडा पोलिसांनी परस्परविरुद्ध बाजूने दाखल केलेल्या तक्रारीवरून दोन्ही गटांतील चौघांविरुद्ध गुन्य दाखल केला आहे. हल्ल्यातील जखमींना उपचारासाठी अचलपूर उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. विलास देविदास सोळंके (वय ३७, शिवाजीनगर, परतवाडा) यांच्या तक्रारीवरून त्यांना संशयित देवेंद्र रामाजी सूर्यवंशी, अमोल देवेंद्र सूर्यवंशी या दोघांनी दुचाकीवरून खाली ओढून जवर मारहाण केली. एकाने जवळ असलेल्या चाकूने हल्ला केला. तो चाकू विलास सोळंके यांचा पुतण्या विनोद सोळके याला लागून तो जखमी झाला. विलास देविदास सोळंके यांच्या राक्रारीवरून पोलिसांनी संशयित देवेंद्र व अमोल सूर्यवंशी या दोघांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. परस्परविरुद्ध बाजूने अमोल देवेंद्र सूर्यवंशी (वय ३४) यांनी तक्रार नोंदविली. त्यात अमोल हे वडिलांना घेण्याकरिता परतवाड्यात आले असता, त्यावेळी संशयित विलास देविदास सोळके व शिवम विनोद सोळंके (वय ३४) हे दोघे वडिलांना शिवीगाळ करीत हेते. त्यांना अमोल याने हटकले असता, संशयितांनी काठीने मारहाण करून जखमी केले. जखमी अमोल यांच्या तक्रारीवरून परतवाडा पोलिसांनी दोधा संशयितांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

# वन विभागाच्या सुवर्ण पदक विजेत्या आरएफओला ४० दिवसांतच निलंबन

## वनपरिक्षेत्र अधिकाऱ्यांना गौरविल्यानंतर शासनाला झाली उपरती



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.६अमरावती**

वने आणि वन्यजीव संवर्धनात उत्कृष्ट कार्य केल्याबद्दल दि. २१ मार्च २०२५ रोजी वनमंत्री गणेश नाईक यांच्या हस्ते सुवर्ण पदकाने गौरवण्यात आलेल्या महिला आरएफओला अवघ्या ४० दिवसांत निलंबित करण्यात आले आहे. स्नेहल अवसरमल वनक्षेत्रपाल (प्रादेशिक) नवापूर, धुळे असे निलंबित करण्यात आलेल्या आरएफओचे नाव आहे.

धुळे जिल्ह्यातील नवापूर येथील प्रादेशिक वनक्षेत्रपाल म्हणून कार्यरत असलेल्या स्नेहल अवसरमल यांच्यावर शासकीय कर्तव्यात हलगर्जीपणा, निष्काळजीपणा आणि वित्तीय अनियमितता केल्याचे आरोप आहेत. यासंदर्भात धुळेचे प्रादेशिक वनसंरक्षक (प्रादेशिक) निनू सोमराज यांनी दि. ३० मे २०२५ रोजी त्यांच्या निलंबनाचे आदेश जारी केले.

### शासन, निवड समितीच्या लक्षात का आणून दिले नाही?

महसूल व वनविभागाच्या राज्यस्तरीय पदक निवड समितीची बैठक प्रधान सचिव (वने) यांच्या अध्यक्षतेखाली दि. ९ नोव्हेंबर २०२४ रोजी पार पडली होती. या बैठकीत सन २०२०-२०२१, २०२१-२०२२ आणि २०२२-२०२३ या वर्षात प्राप्त झालेल्या प्रस्तावांची छाननी करून वर्षनिहाय पदकांसाठी ७९ अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या नावांची शिफारस केली होती.

यात आरएफओ स्नेहल अवसरमल यांची वन, वन्यजीव संरक्षणात उत्कृष्ट कार्य केल्याबद्दल सन २०२२-२०२३ या वर्षासाठी सुवर्णपदकासाठी निवड करण्यात आली होती.

### फेब्रुवारीत चौकशी समिती गठित, मार्चमध्ये सुवर्णपदक

नवापूरच्या वनक्षेत्रपाल स्नेहल अवसरमल यांच्या संदर्भातील तक्रारीच्या अनुषंगाने २४ फेब्रुवारी २०२५ रोजी त्रिसदस्यीय समिती गठित करण्यात आली होती.

आरएफओ अवसरमल यांनी नवापूर प्रादेशिकमध्ये २६ लाख ६१ हजार २३० रुपये, तर रोहयोत १८ लाख ४६ हजार ९२ रुपये असे एकूण मिळून ४५ लाख १७ हजार ३२२ रुपयांची अनियमितता केल्याचा ठपका ठेवण्यात आला आहे.

### प्रस्ताव तपासला कुणी? वनविभागात मुख्य वनसंरक्षकांकडून


उत्कृष्ट कार्य करणाऱ्या अधिकारी, कर्मचाऱ्यांच्या नावांची पुरस्कारासाठी शिफारस मागविली जाते. या शिफारशीनुसार गोपनीय अहवाल, सचोटी, चारित्र्य, तांत्रिक कार्यक्षमता, बुद्धिमत्ता व त्यांनी विकसित केलेले तंत्रज्ञान आदींचा विचार करून पदके प्रदान करण्यासाठी निवड समिती ठरविते. असे असताना स्नेहल अवसरमल यांचा प्रस्ताव तपासला कुणी? असा सवाल यानिमित्ताने उपस्थित होत आहे.

# अमरावतीच्या 'ट्रायबल'मध्ये समुपदेशनाने कर्मचाऱ्यांची 'फेस टू फेस' बदली

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.६अमरावती**

आदिवासी विकास विभागाच्या अमरावती अपर आयुक्त कार्यालयांतर्गत १३ जिल्ह्यांमध्ये शिक्षक, प्रयोगशाळा सहायक, मुख्याध्यापक, अधीक्षक, लिपिक आदी ४२९ पदांच्या समुपदेशनाने 'फेस टू फेस' नियतकालिक बदल्या करण्यात आल्या आहेत. एकूण २८ संवर्गात कार्यरत पदांच्या ३० टक्केच्या मर्यादेत बदलीपात्र ठरणाऱ्या कर्मचाऱ्यांना पसंतीनुसार नियुक्ती देण्यात आली आहे. यंदा एकही तक्रार न येता ही बदली प्रक्रिया राबविण्यात आली आहे.

शासकीय अधिकारी-कर्मचाऱ्यांची बदली प्रक्रिया म्हटले की, तक्रार, भानगडी, न्यायालयीन प्रकरणे ही घडतातच. मात्र, 'ट्रायबल'च्या अमरावती एटीसी कार्यालयाने धारणी, पांढरकवडा, अकोला, छत्रपती संभाजीनगर, पुसद, कळमनुरी या सातही एकात्मिक प्रकल्पांतर्गत अधिकारी, कर्मचाऱ्यांच्या २०, २१ आणि २२ मे २०२५ या तीन दिवशी राबविलेल्या समुपदेशनाद्वारे बदल्या 'फेस टू फेस' करण्यात आल्या. पसंतीक्रमानुसार बदली ठिकाणच्या नियुक्तीला प्राधान्य देण्यात आले. तसेच अवघड आणि बिगर अवघड क्षेत्रनिहाय याद्या २० मार्च २०२५ रोजी प्रसिद्ध करण्यात आल्यामुळे बदलीपात्र कर्मचाऱ्यांची ओरड दिसून आली नाही.



> कर्मचाऱ्यांची 'फेस टू फेस' म्हणेल त्या जागेवर आणि पसंतीनुसार समुपदेशनाद्वारे बदली करण्यात आली. त्यामुळे यंदा कोणाचीही ओरड नाही. पारदर्शकपणे आणि नियमानुसार बदल्या झाल्यामुळे विभागाला गालबोट लागले नाही.
>
> **– जितेंद्र चौधरी, अपर आयुक्त, अमरावती 'ट्रायबल'**

प्राथमिक शिक्षक, माध्यमिक शिक्षक, कनिष्ठ लिपिक, उपलेखापाल, अदिवासी विकास निरीक्षक, कार्यालय अधीक्षक, संशोधन सहायक, कनिष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी, ग्रंथपाल, प्रयोगशाळा सहायक, गृहपाल आदींचा समावेश आहे. २८ संवर्गात एकूण कार्यरत पदांच्या ३० टक्के मर्यादेत ४२९ कर्मचाऱ्यांच्या बदल्या झाल्या आहेत.

**अमरावती एटीसीच्या नावे कर्मचारी संघटनेचे प्रशस्तीपत्र**

आदिवासी विकास विभाग, अमरावतीच्या अपर आयुक्त कार्यालयाने भ्रष्टाचारमुक्त आणि पारदर्शक पद्धतीने समुपदेशाद्वारे सन २०२५ च्या नियतकालिक बदल्या केल्याबद्दल आदिवासी विकास आश्रमशाळा शिक्षक व कर्मचारी संघटनेने ६ जून २०२५ रोजी अपर आयुक्त जितेंद्र चौधरी यांच्या नावे अमरावती विभागाला प्रशस्तीपत्र दिले आहे. संघटनेचे राज्याध्यक्ष डॉ. डी. एल. कराड, कार्याध्यक्ष एस. जे. शेवाळे, सरचिटणीस प्रा. बी. टी. भामरे यांच्यासह नागपूर विभागीय अध्यक्ष रामदास खवशी, ठाणे विभागीय अध्यक्ष डॉ. प्रमोद पोगरे, अमरावती विभागीय अध्यक्ष डॉ. अशोक झुंझारे, नाशिक विभागीय अध्यक्ष अमोल वाबळे यांनी बदली प्रक्रियेचे कौतुक केले आहे.

# अचलपूर नगर परिषदचा प्रशासकाचे भरोस्यावर

## कर्मचारी-अधिकाऱ्यांच्या मनमानी कारभार : मूलभूत सुविधा कोलमडल्या

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.६अचलपूर**



अचलपूर नगरपालिकेचा कार्यभार सध्या प्रशासकावर आहे. नागरिकांच्या तक्रारी व समस्याना महिनो गिनती सुटल्या जात नाहीत नागरिक कार्यालयात चकरा मारून थकतात मात्र त्यांची कुणीही दखल घेत नाही. अधिकारी आणि कर्मचारी वेळेवर उपस्थित राहत नाहीत. अनेक दिवस वाट पाहूनही त्यांचे काम पूर्ण होत नसल्याचे नागरिकांमध्ये चर्चा आहेशहरातील स्वच्छता व्यवस्था पूर्णपणे कोलमडली आहे. गटारे तुंबलेली असून त्यामुळे दुर्गंधी पसरते आहे व आजारांचा धोका वाढत आहे. पिण्याच्या पाण्याचा नियमित पुरवठा होत नाही. स्ट्रीट लाईट्स वर्षानुवर्षे बंद पडल्या आहेत. या सगळ्या समस्यांवर अधिकारी कोणतीही जबाबदारी घेत नाहीत.कार्यालयात कर्मचारी केव्हा येतात आणि केव्हा जातात, याला काही नियम नाहीत. नागरिक दिवसभर ताटकळत बसून राहतात, पण त्यांचे काम न होता निराश होऊन परतावे लागते. काही नागरिकांना एकाच कामासाठी सलग अनेक महिने वाट पाहावी लागते.विविध विभागांमध्ये समन्वयाचा पूर्ण अभाव आहे. एक विभाग दुसऱ्यावर जबाबदारी ढकलतो. काही कर्मचाऱ्यांना त्यांच्या कामाची माहितीही नसल्याच्या तक्रारी नागरिकांनी केल्या आहेतनिवडणुकीच्या काळात मोठमोठी आश्वासने दिली जातात, पण वास्तवात यांची अंमलबजावणी होत नाही. योजना अर्धवट राहतात, आणि जनतेशी संवाद पूर्णपणे करीत नाहीत

स्थानिक नागरिकांनी अनेक वेळा तोंडी व लेखी तक्रारी केल्या आहेत, परंतु त्यावर आजपर्यंत कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही नगरपरिषदेचे मुख्याधिकारी धीरज गोहड फक्त आश्वासने देऊन मोकळे होतात. 'घरकुल' योजनेसाठीही नागरिकांना अनेकवेळा कार्यालयाचे फेरे मारावे लागतात, पण तरीही काम होत नाही.आमदार बदलूयानंतर अचलपूरच्या विकासाला ब्रेक लागल्याचे चिन्ह दिसत आहे.

# उद्यापासून अमरावतीत १२ वी बेसबॉल राष्ट्रीय फेडरेशन कप स्पर्धा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.६अमरावती**



महाराष्ट्र बेसबॉल असोसिएशन व अमरावती जिल्हा बेसबॉल असोसिएशन यांच्या यजमानपदा खाली १२ वी राष्ट्रीय बेसबॉल फेडरेशन कप चे आयोजन ७ ते १० जून पर्यंत अमरावतीत करण्यात आले आहे. या स्पर्धेत संपूर्ण भारतातून ४०० हून अधिक राष्ट्रीय खेळाडू, प्रशिक्षक, मार्गदर्शक अमरावतीत येत आहे.

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचे मैदानात होणाऱ्या १२व्या राष्ट्रीय स्पर्धेत ३७ व्या वरिष्ठ राष्ट्रीय बेसबॉल स्पर्धा, संगरूर, पंजाब येथे उपांत्य फेरीत आलेले ८ टॉप संघ त्यामध्ये यजमान महाराष्ट्र,मध्यप्रदेश, पंजाब, दिल्ली, केरळ, उत्तराखंड, हरियाणा, चंदीगड हे पुरुषांचे , तर पंजाब, दिल्ली, यजमान महाराष्ट्र, केरळ, हरियाणा, हिमाचल प्रदेश, चंदीगड, ओडिशा हे महिलांचे संघ सहभागी होणार आहेत.

या स्पर्धेनिमीत्त संपूर्ण भारतातून सुमारे ४०० हून अधिक राष्ट्रीय खेळाडू, प्रशिक्षक, पंच अमरावतीत येत आहे. या स्पर्धेसाठी यजमान अमरावती मध्ये महाराष्ट्र संघाचे सराव शिबीर संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या मैदानावर सुरु झाले आहे. या स्पर्धेचे उद्घाटन ८ तारखेला सायंकाळी ५.०० वाजता मा.खा.श्री. बळवंत वानखडे यांच्या हस्ते माजी पालकमंत्री अड्. यशोमती ठाकूर, ऑम्युचुअर बेसबॉल फेडरेशन ऑफ इंडियाचे अध्यक्ष श्री. डी.डी. गर्ग, महासचिव अरविंदकुमार व खजीनदार एस. व्यंकटेश यांच्या प्रमुख उपस्थितीत व महाराष्ट्र बेसबॉल असोसिएशनच्या पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत होणार आहे. तर स्पर्धेचा समारोप व बक्षीस वितरण १० तारखेला सायंकाळी ४:०० वाजता संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या शारीरिक शिक्षण विभाग प्रमुख प्रा.डॉ. तनुजा राऊत, महाराष्ट्र बेसबॉल संधटनेचे सचिव श्री. राजेंद्र इखनकर यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे.

या स्पर्धेत आंतरराष्ट्रीय खेळाडू सहभागी होणार असून महाराष्ट्राच्या संघामध्ये यावर्षीचे शिवछत्रपती पुरस्कारप्राप्त खेडाळू श्री प्रदीप पाटील, रेखा धनगर यांच्या सह महाराष्ट्रचे आंतरराष्ट्रीय खेळाडू नंदन परब, ऋषीकेश राऊळ, संतोष कचरे, ज्योती पवार, आरती भगत, विद्या गिरी, रिया आगवणे, रितु फ्रांसीस या खेळाडूंचा समावेश आहे.या स्पर्धेकरीता महाराष्ट्र बेसबॉल संघटनेचे सचिव व अखिल भारतीय बेसबॉल फिडरेशनचे नवनिर्वाचित उपाध्यक्ष राजेंद्र इखणकर, स्पर्धेचे आयोजक सचिव व महाराष्ट्र बेसबॉल असोसिएशनचे उपाध्यक्ष इंद्रजित नितनवार, खजिनदार दिपेन वाळके सहसचिव, मकरंद कोऱ्हाळकर, तांत्रिक समिती प्रमुख अशोक सरोदे, महाराष्ट्र संघाचे प्रशिक्षक संतोष खेंडे, पंचप्रमुख चरणजित सिंग, आयोजक अमरावती जिल्हा बेसबॉल संघटनेचे प्रा. डॉ. सुनिलकुमार, शरद गढीकर यांच्यासह संघटनेचे पदाधिकारी व खेळाडू प्रयत्न करीत आहेत.

# आठ महिन्यांपासून मानधन थकल्याने घंटागाडी चालकांचं अमरावती महानगरपालिकेत बेमुदत आंदोलन


**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.६अमरावती**



गेल्या आठ महिन्यांपासून मानधन थकविल्याने अखेर संतप्त झालेल्या अमरावती शहरातील घंटागाडी चालकांनी आजपासून आपली सर्व गाड्या महानगरपालिका मुख्यालयाच्या आवारात उभ्या करून बेमुदत आंदोलन सुरू केले आहे.यामुळे शहरातील कचरा व्यवस्थापन पूर्णपणे ठप्प झालं असून, ठिकठिकाणी कचऱ्याचे ढिग वाढू लागले आहेत. या आंदोलनामुळे अमरावती शहरातील दररोज उचलला जाणारा कचरा आज उचलला गेला नाही. त्यामुळे सकाळपासूनच अनेक भागांत दुर्गंधी पसरली आहे. अंदाजे सात कोटी रुपयांहून अधिक मानधन रक्कम पालिकेकडे थकीत असून, अनेक वेळा पाठपुरावा करूनही पालिकेकडून काहीच प्रतिसाद न मिळाल्याने चालकांनी हा मार्ग स्वीकारल्याची माहिती आहे. घंटागाडी चालकांच्या या आंदोलनामुळे संपूर्ण कचरा व्यवस्थापन व्यवस्था ठप्प झाली असून, याचा परिणाम शहराच्या स्वच्छतेवर होत आहे. दरम्यान, महानगरपालिका आयुक्त सचिन कलंत्री यांच्यासोबत सफाई कंत्राटदारांची चर्चा सुरू असून, आंदोलनाचा तोडगा निघतो का याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# शिक्षकांच्या ऑनलाईन बदल्यांबाबत अजुनही संभ्रमावस्था; ३१ मे ची मुदत संपली , पुढे काय?

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.६अमरावती**



मागील तीन महीण्यापासून सुरू असलेल्या शिक्षक ऑनलाईन बदली प्रक्रीयेत रोज एक नवीन अडथळा निर्माण होत असून शासन निर्णयानुसार ३१ मे रोजी बदलीची मुदत संपल्यामुळे शिक्षकांच्या ऑनलाईन बदल्या होणार की नाही असा संभ्रम शिक्षकांमध्ये निर्माण झाला आहे. ग्राम विकास विभागाच्या १८ जून २०२४ च्या शासन निर्णयानुसार एकूण ७ टप्प्यात शिक्षकांची ऑनलाईन बदली प्रक्रीया राबविण्यात येणार आहे. ७ नोव्हेंबर २०२४ रोजी ग्राम विकास विभागाकडून २८ एप्रील ते ३१ मे असे प्रत्यक्ष बदली प्रक्रीयेचे वेळापत्रक जाहीर करण्यात आले होते. परंतू पुढे या वेळापत्रकात वारंवार बदल करण्यात आला.ऑनलाईन प्रक्रीयेत वारंवार निर्माण झालेल्या तांत्रिक अडचणी , शिक्षक व शिक्षक संघटना यांनी दाखल केलेली न्यायालयीन प्रकरणे व त्याबाबत उच्च न्यायालयाने पारीत केलेले आदेश, तसेच जुन्या-नव्या संच मान्यतेबाबतचा संभ्रम या सर्व बाबींमुळे शिक्षक ऑनलाईन बदली प्रक्रीयेत सातत्याने अडथळे निर्माण झाल्याने अजूनही संवर्गनिहाय प्रत्यक्ष बदली प्रक्रियेला सुरूवात होवू शकली नाही.

### प्रशासनाची उदासिनता कारणीभूत



प्रशासकीय व तांत्रिक अडचणी आणि न्यायालयीन प्रकरणे यामुळे बदली प्रक्रीया लांबली हे जरी खरे असले तरी वारंवार बदलणारे निकष ,शिक्षण व ग्राम विकास विभागातील असमन्वय आणि प्रशासकीय उदासिनता याबाबी सुद्धा बदली प्रक्रीया लांबण्यासाठी कारणीभूत ठरत असाव्यात.त्यामुळे खरं तर शासनाच्या हेतूवरच शिक्षकांकडून शंका निर्माण होवू लागली आहे. शासनाने बदली प्रक्रीया तातडीने सुरू करून लवकरात लवकर पुर्ण करावी.

**राजेश सावरकर,राज्य प्रसिध्दी प्रमुख**
**महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती**

**३४ दिवसाचा कार्यक्रम**

७ नोव्हेंबर २०२४ च्या वेळापत्रकानुसार संपुर्ण बदली प्रक्रीयेकरीता ३४ दिवसाचा कालावधी लागणार होता. हे वेळापत्रक गृहीत धरले तर आज जरी प्रक्रीया सुरू झाली तरी बदली प्रक्रीया पुर्ण व्हायला जुलै उजाडेल. विदर्भ वगळता उर्वरीत महाराष्ट्रातील शाळा १६ जून रोजी तर विदर्भातील शाळा २३ जून रोजी सुरू होणार आहे , त्यामुळेच आता शाळा सुरू होण्याआधी बदली प्रक्रीया पुर्ण होणे शक्य नाही. त्यामुळे बदल्या होणार की नाही याबाबतचा संभ्रम अधिकच वाढला आहे.संध्दा बदली बाबतच्या यादया प्रसिध्द झाल्या आहे.पण समानिकर व रीक्त जागा घोषित झाल्या नाही.या बदली टप्याला वारंवार मुदत वाढ करण्यात येत आहे.विदर्भ वगळता उरवरीत महाराष्ट्राती शाळा १६जूनला सुरु होणार आहे तर विदर्भातील शाळा २३जून पासुन सुरु होणार आहे.त्यामुळे बदल्यांचे टप्पे कसे पूर्ण होईल यात संर्भम निर्माण झाला आहे.

